
रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक २
www.ramprahar.com
◆ रविवार, १९ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
मुरूडमध्ये समुद्राच्या पाण्याला पिवळसर थर/२
रायगडात ९१० शेतकऱ्यांची पीक विमा नोंदणी/५
पी.व्ही. सिंधू 'जपान ओपन'च्या फायनलमध्ये/८

## 'त्या' सहा खासदारांच्या शिंदेसेनेत विलीनीकरणास मंजुरी



**नवी दिल्ली :** उद्धव ठाकरे यांच्या पक्षातून बाहेर पडलेल्या सहा खासदारांच्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील विलीनीकरणास शनिवारी (दि.१८) लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंजुरी दिली. खासदार सर्वश्री ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील, संजय उर्फ बंडू जाधव, संजय देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे आणि नागेश पाटील यांनी १७ जूनला लोकसभा अध्यक्षांची भेट घेत त्यांना शिंदेसेनेत विलीन होत असल्याचे पत्र दिले होते, मात्र या विलीनीकरणाला मान्यता देऊ नये यासंदर्भात ठाकरे गटाचे खासदार आणि लोकसभेतील गटनेते अरविंद सावंत यांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र दिले होते. त्यामुळे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या निर्णयाकडे लक्ष लागले होते, परंतु लोकसभा सचिवालयाने नियमानुसार सहा खासदारांच्या वेगळ्या गटाला शिंदे गटातील विलीनीकरणास मंजुरी दिली आहे.

# पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक -आमदार प्रशांत ठाकूर

## पर्यावरणपूरक शवदाहिनीचे लोकार्पण, प्राणी अंत्यसंस्कार केंद्राचे भूमिपूजन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे असून निसर्गसंपदा आपल्या पुढील पिढीलाही लाभली पाहिजे या दृष्टिकोनातून आपण निसर्गाचे जतन केले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथे केले.





पनवेल महानगरपालिकेच्या वतीने खारघर सेक्टर १४ येथील हिंदू स्मशानभूमीत उभारण्यात आलेल्या पर्यावरणपूरक शवदाहिनीचे लोकार्पण तसेच प्राणी अंत्यसंस्कार केंद्राच्या उभारणीचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१७) झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या पर्यावरणपूरक कामांसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापालिकेचे मनापासून अभिनंदन केले. महापालिकेची पर्यावरणविषयक कटिबद्धता अशा कृतींमधून स्पष्टपणे दिसून येत असून पर्यावरणाचा वारसा भावी पिढ्यांसाठी जतन व्हावा यासाठी तंत्रज्ञानाचा उत्तम वापर करून महापालिका सकारात्मक पावले उचलत असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौर नितीन पाटील यांनी सांगितले की, पनवेल शहर आता आंतरराष्ट्रीय शहर बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून त्या दृष्टीने पर्यावरणपूरक गोष्टींचे महत्त्व कमालीचे वाढत आहे. त्यांनी सर्व नागरिकांना पर्यावरण्याचे संवर्धन करण्याचे आवाहन करतानाच यासाठी नागरिकांचे सहकार्य व सूचना अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे नमूद केले.

खारघर सेक्टर १४ येथील स्मशानभूमीमध्ये कार्यान्वित करण्यात आलेली ही प्रणाली नैसर्गिक वायूप्रवाहावर आधारित असून ती अत्यंत शाश्वत आणि कमी प्रदूषण करणारी आहे. या प्रणालीमुळे केवळ १२५ किलो लाकडाची आवश्यकता भासेल. लाकडाच्या कमी वापरामुळे कार्बन उत्सर्जनात मोठी घट होणार आहे. धूर, दुर्गंधी व हानिकारक वायूंवर प्रभावी नियंत्रण मिळवता येत असल्याने दहन प्रक्रिया जलद, कार्यक्षम आणि स्वच्छ होईल. सौरऊर्जेसारख्या शाश्वत तंत्रज्ञानाचा वापर केलेल्या या यंत्रणेमुळे स्वच्छ, सुरक्षित व सन्मानपूर्वक अंतिम संस्काराची सुविधा उपलब्ध झाली असून यामुळे कमी देखभाल खर्चात दीर्घकालीन आर्थिक बचत होणार आहे.

यासोबतच भूमिपूजन झालेल्या प्राण्यांच्या शवदाहिनीमुळे मृत प्राण्यांची वैज्ञानिक व सन्मानपूर्वक सुरक्षित विल्हेवाट लावणे शक्य होणार आहे. यामुळे शहरात दुर्गंधी, संसर्ग व रोगराईचा धोका मोठ्या प्रमाणावर कमी होऊन सार्वजनिक आरोग्याचे रक्षण होईल. धूर आणि प्रदूषणावर नियंत्रण मिळवणारी ही पर्यावरणपूरक व्यवस्था असून यामध्ये मोठ्या व लहान प्राण्यांसाठी स्वतंत्र व विविध क्षमतेची आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

या कार्यक्रमाला उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, आयुक्त मंगेश चितळे, नगरसेवक मनोज भुजबळ, प्रवीण पाटील, समीर कदम, मधू पाटील, दिनेश खानावकर,नरेश ठाकूर, शशिकांत शेळके, नगरसेविका अनिता पाटील, सरस्वती काथारा, दमयंती भोईर, मनाली ठाकूर, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, ब्रिजेश पटेल, संजय जैन, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.



नागपूर : 'मिशन ऑरेंज सिटी' उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी रामगिरी निवासस्थानी संत्रावृक्षरोपणाने मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी आमदार परिणय फुके, महापौर नीता ठाकरे, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी, ज्येष्ठ पत्रकार अतुल पांडे तसेच अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

## 'रामप्रहर'चा वर्धापन दिन उत्साहात साजरा : लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती



(अधिक छायाचित्रे पान ६वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड आणि नवी मुंबईत अग्रेसर असलेल्या दैनिक रामप्रहरचा १८वा वर्धापन दिन शनिवारी (दि.१८) उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी 'रामप्रहर' कार्यालयाला भेट देत श्री सत्यनारायणाच्या पूजेचे दर्शन घेतले व सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, 'रामप्रहर'चे मुख्य संपादक देवदास मटाले, व्यवस्थापक दादाराम मिसाळ, वृत्त संपादक समाधान पाटील, उपसंपादक नितीन देशमुख, सुधाकर जगताप, मुख्य आर्टिस्ट अरुण चवरकर, शशिकांत बारसिंग, सुबोध ठाकूर, लेखापाल उद्धव घरत, वितरण विभागाचे महेश काळे, माजी व्यवस्थापक हरिभाऊ देशमुख, पत्रकार प्रकाश सोनवडेकर, सहाय्यक करण वाहुळकर आदी उपस्थित होते.

दरम्यान, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, उपसभापती भूपेंद्र पाटील, 'रामप्रहर'चे मुद्रक, प्रकाशक कृष्णाशेठ ठाकूर आदी मान्यवरांनीही उपस्थिती दर्शविली, तर रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी संदेश पाठवून शुभेच्छा दिल्या.



## निवडक

### गुजरातमध्ये फटाका फॅक्टरीत स्फोट; आठ जणांचा मृत्यू

**अहमदाबाद :** गुजरातच्या अहमदाबादमधील महमूदपुरा भागात फटाक्यांच्या फॅक्टरीत शनिवारी (दि.१८) भीषण स्फोट झाला. या स्फोटात आठ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला असून १५ जण जखमी झाले आहेत. स्फोटाची माहिती समजताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या आणि जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करीत बचाव मोहीम सुरू केली. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### सोनम वांगचूक यांना रुग्णालयात केले दाखल

**नवी दिल्ली :** जंतरमंतर येथे गेल्या २० दिवसांपासून उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांची प्रकृती बिघडल्याने शनिवारी (दि.१८) पोलिसांनी त्यांना सफदरजंग रुग्णालयात दाखल केले. सलग २० दिवसांच्या उपोषणामुळे त्यांचे वजन ९.५ किलोहून अधिक घटले असून त्यांना डिहायड्रेशनचा त्रास जाणवत होता. रुग्णालय प्रशासनाच्या माहितीनुसार दीर्घकाळ उपवास केल्यामुळे वांगचूक यांना सौम्य अशक्तपणा व शरीरात पाण्याची कमतरता आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.

## भारताचा अवकाश क्षेत्रात नवा इतिहास!

### पहिले खासगी रॉकेट विक्रम-१चे यशस्वी प्रक्षेपण

**श्रीहरिकोटा : वृत्तसंस्था**

भारताच्या अवकाश क्षेत्रासाठी शनिवारचा (दि.१८) दिवस ऐतिहासिक ठरला. हैदराबादस्थित स्कायरूट एअरोस्पेस या खासगी कंपनीने भारतातील पहिले खासगी ऑर्बिटल रॉकेट 'विक्रम-१'चे श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अवकाश केंद्रातून सकाळी ११.३० वाजता यशस्वी प्रक्षेपण केले.

केंद्र सरकारने २०२३मध्ये जाहीर केलेल्या नव्या अवकाश धोरणानंतर खासगी कंपन्यांना स्वतःचे रॉकेट आणि उपग्रह विकसित करून त्यांचे प्रक्षेपण करण्याची परवानगी प्राप्त झाली. या निर्णयानंतर भारतातील खासगी अवकाश उद्योगाला मोठी चालना मिळाली आहे. प्रक्षेपणानंतर रॉकेटने नियोजित सर्व टप्पे यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यानंतर उपग्रह निर्धारित कक्षेत यशस्वीरित्या स्थापित करण्यात आला. संपूर्ण प्रक्षेपण प्रक्रियेवर 'इस्रो'च्या शास्त्रज्ञांनी बारकाईने लक्ष ठेवले होते.

स्कायरूट एअरोस्पेसने कमी खर्चात लहान उपग्रह अवकाशात पाठवण्यासाठी अत्याधुनिक प्रक्षेपण तंत्रज्ञान विकसित केले आहे. त्यामुळे भारत जागतिक व्यावसायिक अवकाश बाजारपेठेत अधिक सक्षमपणे स्पर्धा करू शकणार आहे.

**■ 'मिशन आगमन'ची वैशिष्ट्ये**

या मोहिमेला 'आगमन' असे नाव देण्यात आले आहे. याद्वारे ग्रह स्पेस, कॉस्मोसर्व, डीक्यूब आणि स्कायरूट यांच्या लघु उपग्रहांचे प्रक्षेपण करण्यात आले. या उपग्रहांच्या माध्यमातून भविष्यवेधी अवकाश तंत्रज्ञानाची चाचणी केली जाणार आहे. याशिवाय कॉसमॉस डायमंड यांनी तयार केलेली विशेष कलाकृती, भारतीय शास्त्रज्ञांच्या सूक्ष्म प्रतिमा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिलेला 'वंदे मातरम्' संदेशही अवकाशात पाठवण्यात आला आहे.

## रायगड पोलीस दल सर्वसाधारण विजेते

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२६मध्ये रायगड पोलीस दलाने दमदार कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. नऊ सुवर्ण, सहा रौप्य आणि सात कांस्य अशा एकूण २२ पदकांची कमाई करत रायगड पदकतालिकेत अव्वल ठरला.



१३ ते १५ जुलैदरम्यान रायगड पोलीस दलाच्या वतीने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कोकण परिक्षेत्रातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर आणि ठाणे ग्रामीण या पाच घटकांतील पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि श्वान पथकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

वैज्ञानिक तपास सहाय्य, स्फोटकविरोधी तपासणी, पोलीस छायाचित्रण, पोलीस चलतचित्रण, संगणक जनजागृती आणि श्वान पथक स्पर्धा अशा सहा प्रमुख विषयांसह २० उपप्रकारांमध्ये लेखी व प्रात्यक्षिक स्वरूपातील स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये २१ पोलीस अधिकारी, ८८ पोलीस अंमलदार आणि श्वान पथकांनी सहभाग नोंदविला.

रायगडने २२ पदकांसह प्रथम क्रमांक मिळविला. रत्नागिरी जिल्ह्याने दोन सुवर्ण, पाच रौप्य व सात कांस्य अशा १४ पदकांसह द्वितीय, तर पालघरने तीन सुवर्ण, तीन रौप्य व तीन कांस्य अशा नऊ पदकांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. सिंधुदुर्ग आणि ठाणे ग्रामीण यांनी अनुक्रमे चौथे व पाचवे स्थान मिळविले.

मेळाव्याच्या समारोपप्रसंगी कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रकिशोर मीणा यांच्या हस्ते विजेत्यांना पदके, प्रशस्तीपत्रे आणि सर्वसाधारण विजेत्या रायगड पोलीस दलाला मानाची ट्रॉफी प्रदान करण्यात आली. याचबरोबर परीक्षकांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रकिशोर मीणा आणि रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी सर्व पदक विजेते तसेच सहभागी स्पर्धकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## ज्येष्ठ समाजवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**



१९६०-७०च्या दशकात सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत मोलाचे योगदान देणारे आणि मानवी हक्कांसाठी आयुष्य वेचलेले ज्येष्ठ समाजवादी विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांचे शनिवारी (दि.१८) निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते.

साहित्य क्षेत्रातही सप्तर्षी यांचे मोठे योगदान होते. त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखनही केले आहे. पुण्यातून युवक क्रांती दल या संघटनेची स्थापना त्यांनी केली होती. याशिवाय नगरसेवक ते आमदार अशी त्यांची राजकीय कारकीर्दही राहिली आहे. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी सोमवारी सकाळी १० ते १२ या वेळेत कोथरूड येथील गांधी भवनात ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येतील.

## कर्जत लोकल मार्गावर वाढीव १५ डब्यांच्या फेऱ्या

**नेरळ : प्रतिनिधी**

दररोज मुंबईकडे प्रवास करणाऱ्या मध्य रेल्वेवरील कर्जत, नेरळ, भिवपुरी रोड, वांगणी, बदलापूर आणि परिसरातील हजारो रेल्वे प्रवाशांसाठी दिलासादायक बातमी आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने २० जुलैपासून आणखी १० उपनगरी लोकल गाड्या १२ डब्यांऐवजी १५ डब्यांसह चालविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विशेषतः कर्जत मार्गावरील प्रवाशांना गर्दीपासून मोठा दिलासा मिळणार आहे.



मुंबई विभागाच्या ऑपरेशन शाखेने जारी केलेल्या प्रस्तावानुसार पाच डाउन आणि पाच अप अशा एकूण १० लोकल सेवा १५ डब्यांच्या करण्यात येणार आहेत. यामुळे मुंबई मुख्य मार्गावरील १५ डब्यांच्या लोकल सेवांची संख्या २२वरून ३२ होणार आहे, तथापि एकूण उपनगरी लोकल फेऱ्यांची संख्या पूर्वीप्रमाणेच १८२० राहणार आहे.

कर्जतहून मुंबईकडे जाणाऱ्या सकाळच्या तसेच संध्याकाळी परतणाऱ्या प्रवाशांना वाढीव डब्यांचा मोठा फायदा होणार आहे. कार्यालयीन वेळेतील प्रचंड गर्दी, दरवाज्यातील जीवघेणा प्रवास आणि उभे राहण्यासाठीही जागा नसल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

रेल्वे प्रशासनाने संबंधित विभागांना वाढीव १५ डब्यांच्या रॅकची उपलब्धता, प्लॅटफॉर्मवरील सूचना, प्रवासी घोषणाबाजी आणि तांत्रिक बदल तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. १९ ते २० जुलैच्या मध्यरात्रीपासून नवीन १५ डब्यांचा रॅक कार्यान्वित करण्यात येणार असून २० जुलैपासून सुधारित सेवा सुरू होणार आहेत.

## तरुणीची हत्या करून तरुणाची आत्महत्या

**नाशिक :** येथील शहरात एका २० वर्षीय तरुणीची भररस्त्यात धारदार शस्त्राने गळा चिरून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेनंतर काही तासांतच आरोपी तरुणाचाही जॉगिंग ट्रॅकजवळ झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. हा संपूर्ण प्रकार प्रेमप्रकरणातून घडल्याचे समोर आले आहे.

नाशिकच्या इंदिरानगर येथील वनसंपदा सोसायटीतील गार्डनजवळ शुक्रवारी रात्री १०.३०च्या सुमारास वैष्णवी आवारे (२०) या तरुणीची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. वैष्णवी वनसंपदा सोसायटीत पेईंग गेस्ट म्हणून राहत होती. या प्रकरणातील आरोपी साहिल अशोक लाव्हारे हा वैष्णवीचा जुना प्रियकर तिची हत्या करून पसार झाला होता. पोलीस तपास सुरू असतानाच मध्यरात्री इंदिरानगर परिसरातच अशोका हॉस्पिटलसमोरील जॉगिंग ट्रॅकलगत एका झाडाला साहिलचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. वैष्णवीचे लग्न दुसऱ्या तरुणासोबत ठरल्याने संतापलेल्या साहिलने तिची हत्या केली आणि त्यानंतर स्वतःही जीवनयात्रा संपवली. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## 'माथेरानच्या राणी'ला मिळणार नवी ऊर्जा

### मिनीट्रेनला हायड्रोजन इंजिन जोडण्याची तयारी

**माथेरान : प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या कुशीत वळणावळणाने धावणारी 'माथेरान राणी' आता नव्या पर्वाच्या उंबरठ्यावर उभी आहे. हरियाणातील जिंद-सोनीपत मार्गावरील देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनच्या अनुभवातून या रेल्वेला हायड्रोजन इंजिनची ताकद मिळणार असल्याची माहिती मिळत आहे.

रेल्वे मंत्रालयाच्या हायड्रोजन फॉर हॅरिटेज योजनेत माथेरानचा समावेश करण्यात आला असून या ऐतिहासिक मिनीट्रेनला पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची जोड देण्याची तयारी सुरू आहे. हेरिटेज रेल्वेमार्गाचे ऐतिहासिक महत्त्व जपत त्यांना आधुनिक आणि प्रदूषणमुक्त तंत्रज्ञानाची जोड देण्याचा भारतीय रेल्वेचा प्रयत्न आहे. त्यासाठी २०२३-२४च्या केंद्रीय अर्थसंकल्पात हायड्रोजन फॉर हेरिटेज योजनेची घोषणा करण्यात आली होती. या योजनेत माथेरान हिल रेल्वेसह कालका-शिमला, दार्जिलिंग हिमालयन रेल्वे, निलगिरी माउंटन रेल्वे, कांग्रा व्हॅली, बिलीमोरा-वाघई, पाताळपानी कालाकुंड आणि मारवाड-गोरम घाट या वारसास्थळ रेल्वेमार्गांचा समावेश आहे.



रेल्वे मंत्रालयाच्या नियोजनानुसार प्रत्येक हायड्रोजन ट्रेनसाठी सुमारे ८० कोटी रुपये, तर हायड्रोजन उत्पादन आणि इंधन भरण्याच्या सुविधांसाठी ७० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या तंत्रज्ञानामुळे डिझेलवरील अवलंबित्व कमी होऊन पर्यावरणपूरक रेल्वे वाहतुकीला चालना मिळणार आहे.

नेरळ-माथेरान मिनीट्रेन सध्या डिझेल इंजिनवर धावते. हायड्रोजन इंजिनचा वापर सुरू झाल्यास धूर आणि कार्बन उत्सर्जन पूर्णपणे टळेल. दरम्यान, माथेरान हिल रेल्वेवर हायड्रोजन इंजिन कधी धावणार याबाबत रेल्वे मंत्रालयाने अद्याप वेळापत्रक जाहीर केले नाही.

# पुणे २०३०पर्यंत देशाचे 'ग्रोथ इंजिन' बनणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे शहर हे भविष्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञान (डीप टेक) आणि जागतिक क्षमता केंद्रांचे (जीसीसी) प्रमुख केंद्र बनण्याच्या मार्गावर असून सन २०३० पर्यंत पुणे हे देशातील अत्यंत आधुनिक शहर व प्रमुख विकास केंद्र (ग्रोथ इंजिन) म्हणून नावारूपाला येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. शहराची वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राज्य शासनाने पुणे–शिरूर, तळेगाव–चाकण–शिक्रापूर आणि हडपसर–यवत या तीन महत्त्वपूर्ण उन्नत मार्ग प्रकल्पांना गती दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पांतून शासनाला अनुक्रमे ५००, ३०० आणि १५० कोटी असा एकूण ९५० कोटी रुपयांचा



आगाऊ निधी प्राप्त होणार आहे. या प्रकल्पांमुळे पुण्याची वाहतूक कोंडीची समस्या दूर होईल, असेही ते म्हणाले.

गणेश कला क्रीडा मंच येथे पुणे शिरुर, तळेगाव चाकण शिक्रापूर, हडपसर यवत या ३ उन्नत मार्गांच्या प्रकल्पांच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय परिवहन व रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे–शिरूर, तळेगाव–चाकण–शिक्रापूर व हडपसर–यवत या तीन महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीवर व विशेषतः औद्योगिक वसाहतींना जोडणाऱ्या रस्त्यांवरील समस्येवर कायमस्वरूपी उपाय मिळणार आहे. भविष्यातील सार्वजनिक वाहतुकीचा वेध घेत या तिन्ही उन्नत मार्गांवरून पुढील काळात मेट्रो नेण्याचे नियोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

या उन्नत मार्गांवरच भविष्यात मेट्रो मार्गिका उभारण्यासाठी आतापासूनच आवश्यक ती डिझाईन तयार केली आहे. यामुळे भविष्यात जेव्हा मेट्रोचे काम सुरू होईल, तेव्हा कोणताही अडथळा निर्माण होणार नाही व या एकत्रित रचनेमुळे मेट्रोच्या खर्चात किमान ४० टयांची बचत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नव्या पुरंदर विमानतळाशी जोडणी (कनेक्टिव्हिटी) वाढविण्यावरही शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दिवेघाटामध्ये दुहेरी बोगदा तयार करून त्यातून रस्ता व मेट्रो नेल्यास पुरंदर विमानतळावर पोहोचण्याचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल व विनाअडथळा प्रवास शक्य होईल, यादृष्टीने विचार सुरु आहे. या विमानतळासाठी ५० टक्क्यांहून अधिक भूसंपादन पूर्ण झाले असून, देशाच्या इतिहासात इतक्या वेगाने भूसंपादन होण्याचा हा विक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच १७३ किलोमीटरचा बाह्य व ८६ किलोमीटरचा अंतर्गत वर्तुळाकार रस्ता (रिंग रोड) दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून यामुळे शहरातील वाहतूक कोंडी ३० टक्क्यांनी कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पुणे शहर हे अभियांत्रिकी व नवउद्यमांचे (स्टार्टअप) प्रमुख केंद्र असून पुढील काळात ते अत्याधुनिक तंत्रज्ञान (डीप टेक) व जागतिक क्षमता केंद्रांचे (जीसीसी) प्रमुख हब बनेल. देशातील एकूण जीसीसीपैकी जवळपास ३५ टक्के केंद्रे एकट्या पुण्यात उभी राहत आहेत. इतर शहरांसारखी पुण्याची वाहतूक कोंडीची अवस्था होऊ नये, यासाठी हे सर्व प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण केले जातील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

# निलंबित शिक्षकांना कामावर घेऊन थकीत बाकी देण्याचे 'केटीएसपी'ला आदेश

**खोपोली : प्रतिनिधी**

न्यायालयाने निलंबित शिक्षक सुजाता घोरपडे व चार जणांना ४५ दिवसात कामावर घ्यावे तसेच त्यांचा थकीत पगार व इतर फायदे असे पाच कोटी रुपयांची रक्कम देण्याचे आदेश दिल्यामुळे अगोदर जिल्हा बँकेचे कर्ज व त्यातच न्यायालयाच्या निकालाने संस्था चांगलीच अडचणीत आली आहे. पदाधिकाऱ्यांच्या नियोजनशून्य व चुकीच्या निर्णयामुळे संस्थेला आर्थिक फटका बसला आहे.

एकीकडे विद्यार्थी कमी आहे हे सांगून संस्थेने कर्मचाऱ्यांना कमी केले होते पण एआयसीटीचे फायदे घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे संख्या वाढवण्यात आली अशी माहिती मिळत आहे शालेय न्यायालयाने ३१ मार्च २०१८ शिक्षकांच्या बाजूने निकाल देताना संस्थेला निलंबित शिक्षकांना कामावर घेण्याची व त्यांचे थकीत फायदे व इतर फायदे देण्याचे आदेश दिले होते. सन २०२४साली संस्था हायकोर्टात गेली पण हायकोर्टाने शालेय न्यायालयाचा निर्णयावर शिक्कामोर्तब केला त्यानंतर संस्था १७ नोव्हेंबर २०२१मध्ये सुप्रीम कोर्टात गेली पण सुप्रीम कोर्टाने त्याच निकालावर शिक्कामूर्त केल्याने खऱ्या अर्थाने शिक्षकांना न्याय मिळाल्याने शिक्षण क्षेत्रात स्वागत केले जात आहे.

या ११ वर्षाच्या कालावधीत निलंबित शिक्षकांची सहनशीलतेच स्वागत केले जात आहे, आपल्या निलंबन काळात अनेक अडचणींना सामोरे गेल्याचे सुजाता घोरपडे यांनी सांगितले. न्यायालयाच्या निकालाचे आम्ही स्वागत आणि आभार व्यक्त करतो, असे त्यांनी म्हटले आहे.

खालापूर तालुक्यातील गरीब शेतकऱ्यांनी आपल्याकडील धान्य विकून ही संस्था उभारली आहे, आपल्या मुलांना मुंबई पुण्याकडे जायला लागू नये यासाठी ही संस्था उभारली पण सध्या परिस्थितीत या संस्थेची फार मोठ्या प्रमाणात आर्थिक कोंडी झाल्याचे दिसून येत आहे. या निकालाने संस्था पदाधिकाऱ्यांना चांगलाच झटका बसला आहे. त्यामुळे पदाधिकाऱ्यांनी तात्काळ खुर्ची सोडावी अशी मागणी सर्वसामान्यातून होत आहे.



# करंजाडेत एक वृक्ष–हजारो श्वास संकल्पनेवर आधारित वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप करंजाडे यांच्या वतीने एक वृक्ष – हजारो श्वास या संकल्पनेवर आधारित भव्य वृक्षारोपण अभियान राबवण्यात आले. या अंतर्गत करंजाडे सेक्टर ३, येथील गार्डनपरिसरात आयोजित या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा तसेच प्रत्येक नागरिकानेवृक्षलागवड करून हिरवेगार करंजाडे घडविण्याचा संदेश देण्यात आला.



यावेळी सरपंच मंगेश शेलार यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आमदारमहेश बालदी यांच्या माध्यमातून करंजाडे परिसरात अनेक विकासकामे झाली असूनभविष्यातही विकासाची ही गती कायम राहील, असा विश्वास आहे. विकासासोबत पर्यावरण संवर्धनही तितकेच महत्त्वाचे असल्याने प्रत्येक नागरिकाने किमान एकझाड लावून त्याचे संगोपन करावे आणि हरित करंजाडे घडविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाला प्रथमेश पुंडे, सुनील भोईर, नंदकुमार भोईर, नाथाभाई भरवाड,बाबासाहेब भोसले, सुभाष राळे, बाळासाहेब आवारी, पिंटू पायमोडे, प्रथमेशफडणीस यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाचा संकल्प करत, आज लावलेलेप्रत्येक झाड उद्याच्या पिढीसाठी अमूल्य ठेवा ठरेल.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात कायदा क्षेत्रातील करियर सेमिनार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात दि. १२ जुलै २०२६ या दिवशी "जागतिक न्याय दिवस" साजरा करण्यात आला.

"जागतिक न्याय दिनानिमित्त" विद्यालयात "कायदा क्षेत्रातील करिअरच्या संधी" या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी, सध्या यशस्वी



वकील म्हणून कार्यरत असलेले माजी विद्यार्थी ॲडव्होकेट वैभव चौधरी आणि ॲडव्होकेट तबिश मिर्झा हे या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

यावेळी त्यांनी कायदा क्षेत्रातील विविध शाखा, वकील होण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता, प्रवेश प्रक्रिया, करिअरच्या संधी तसेच न्यायव्यवस्थेतील जबाबदाऱ्या याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

या प्रेरणादायी सत्रामुळे विद्यार्थ्यांना कायदा क्षेत्राविषयी सखोल माहिती मिळाली. तसेच या क्षेत्रात उज्वल भवितव्य घडविण्याची प्रेरणा मिळाली. प्राचार्य निशा नायर यांनी या सत्राचे आयोजन केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी आभार मानले.

# मुरूडमध्ये समुद्राच्या पाण्याला पिवळसर थर!

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड समुद्रकिनाऱ्यावरील पाण्याला पिवळसर थर आल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. समुद्राला पिवळसर पाणी झाल्याने निसर्ग प्रेमी संघटनेने चिंता व्यक्त केली आहे .केमिकल कंपनी कडून दूषित पाणी समुद्रात तर सोडण्यात आले नाही अशी शंका व्यक्त केली जात आहे.यासाठी पर्यावरण विभाग यांनी मुरुड येथे भेट देऊन प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी अशी मागणी केली जात आहे.

याशिवाय किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, कचरा आणि इतर टाकाऊ वस्तूंचा साठा झाल्याचे चित्र दिसून येत आहे. समुद्रात वाहून आलेला कचरा आणि प्रदूषणामुळे समुद्राचे सौंदर्य धोक्यात आले असून पर्यावरणावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

मुरुड पर्यटन क्षेत्र असुन या ठिकाणी स्वच्छ व सुंदर समुद्रकिनारा असुन या ठिकाणी रोज शेकडो पर्यटक ये–जा करित असतात.तरी आपल्या पर्यटन क्षेत्रावर कोणताही परिणाम होऊ नये त्याकरिता नागरिकांनी प्लास्टिकचा वापर कमी करावे तसेच कचरा समुद्रात किंवा किनाऱ्यावर न टाकु नये असे आवाहन मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी केले आहे.

# गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षकाकडून स्नेहभोजन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये शुक्रवार दि.१७ जुलै रोजी विद्यार्थ्यांसाठी सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असणारे उपशिक्षक सागर रंधवे यांच्या सौजन्याने शालेय पोषण आहारांतर्गत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

विद्यालयाचे उपशिक्षिक सागर रंधवे यांनी सेवापूर्तीचे औचित्य साधत विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर व उपमुख्याध्यापक



विलासराव लेंभे यांचे विशेष नियोजनान्वये पोषण आहाराच्या माध्यमातून महिन्यातून दरमहा एक स्नेहभोजन या उपक्रमानुसार आणि विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील,रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे, सर्व सेवक कर्मचारी, पोषण आहार विभाग प्रमुख विशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले. विद्यालयातील इयत्ता पाचवी ते बारावी अखेरच्या विद्यार्थ्यांनी या स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे यांच्यासह,गीतांजली म्हात्रे,प्रतिज्ञा घरत, विशांत ठाकूर,इतर सेवक व पोषण आहार सेविका आदींनी भोजन तयार केले. विद्यार्थ्यांनी मनसोक्त आस्वाद घेतला. यावेळी इयत्ता सहावी ब या गुरुकुल वर्गातील विद्यार्थिनींनी स्वतःहून आग्रहपूर्वक स्वयंसेविकांची भूमिका पार पाडली. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर,पोषण आहार विभाग प्रमुख विशांत ठाकूर,ज्येष्ठ शिक्षिका चारुशीला ठाकूर,शितलकुमार म्हात्रे,गीतांजली म्हात्रे, हर्षला पाटील,प्रतिज्ञा घरत,अर्चना पाटील,माधुरी म्हात्रे,क्रीडा शिक्षक सुरेश पारखे,गुरुकुल प्रमुख संदीप भोईर,कलाशिक्षक गणेश भोईर,ज्येष्ठ उच्च माध्यमिक शिक्षक राजेंद्र चौधरी, करुणा तांडेल,अर्चना पाटील,विठ्ठलसिंग पाटील,यांच्यासह धनाजी ठाकूर,जनार्दन खैरे,जयाबाई कोळी,दयानंद खारकर,अरुण कोळी आदींनी स्वतः वाढप्यायची भूमिका बजावली.

# अनधिकृत वाहन पार्किंगविरोधात कारवाई करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

शिरवणे प्रभाग क्रमांक २१ मधील प्रमुख रस्ते व पदपथांवर होत असलेल्या अनधिकृत वाहन पार्किंगच्या समस्येबाबत भाजपाच्या नगरसेविका माधुरी सुतार यांनी तुर्भे विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले.

प्रभागातील अनेक प्रमुख व वर्दळीच्या रस्त्यांवर चारचाकी, दुचाकी तसेच इतर वाहने मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर आणि पदपथांवर पार्क केली जात असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. तसेच पदपथ नागरिकांना चालण्यासाठी उपलब्ध



राहत नसल्याने पादचाऱ्यांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालावे लागत असल्याची बाब नगरसेविका माधुरी सुतार यांनी निदर्शनास आणून दिली. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले यांनी संबंधित ठिकाणांची पाहणी करून लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# कुंभिवली येथे सिलिंडर भरलेला ट्रक उलटला

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

सावरोली–खारपाडा रस्त्यावर कुंभिवली येथे गॅस सिलेंडर भरलेला ट्रक उलटला, मात्र जीवितहानी नाही,यावेळी ट्रक मध्ये ३५० गॅस सिलेंडर होते.

सकाळी चावणे येथून ट्रक क्रमांक MH १४ LX ३७०६ हा गॅस भरलेले ३५० सिलेंडर घेऊन सावरोली खारपाडा मार्गे पुणे जात असताना ट्रक चालकाचे गाडीवरील नियंत्रण सूटल्याने ट्रक कुंभिवली गावात रस्ता सोडून खाली खड्ड्यात उतरला, यात काही दुकान गाळ्यांचे नुकसान झाले असून विद्युत पुरवठा करणारे खांब यांचेही नुकसान झाले आहे, कुंभिवली पाणी पुरवठा पाईप लाईन याचेही नुकसान झाले आहे.

ही घटना समजताच ज्येष्ठ समाजसेवक उमेश गायकवाड यांनी त्वरीत खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार आणि विद्युत विभाग यांना कळविले. पोलीस निरीक्षक सचिन पवार हे घटनास्थळी दाखल



झाल्यावर त्यांनी हेल्प फाऊंडेशनच्या गॅस आणि केमिकल जाणकार यांना पाचारण केले,३५० गॅस सिलेंडर मधील एकही गॅस सिलेंडरला गळती नाही, असे केमिकल गॅस जाणकार धनंजय गीध यांनी सांगितले, आणि सर्वांनी सुटकेचा श्वास घेतला.ही घटना गावातच घडल्याने भीतीचे वातावरणनिर्माण झाले होते.

विद्युत पुरवठा सुरू होता, याची माहिती समोर आल्यावर विद्युत कर्मचारी यांना वीज पुरवठा खंडित करण्यास सांगून ग्रामस्थ, पोलीस यांच्या मदतीने पुढील अनर्थ घडू नये म्हणून परिसरात कुणीही वीज सुरू करू नये, अथवा चूल, गॅस लाऊ नये असे आवाहन करण्यात आले होते. त्यामुळेही हानी टळली.

# निसर्गसौंदर्याने नटलेल्या तळगडाचे पर्यटकांना आकर्षण

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील तळगड किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने एक ऐतिहासिक स्थळ असून पर्यटकांमधे वाढ होत असून एक चांगले पर्यटन स्थळ म्हणून उदयास येत आहे.या तळगडाचा परिसर निसर्ग सौंदर्याने नटल्याने पावसाळ्यातील हे स्थळ पाहण्यासाठी पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीतील ऐतिहासिक तळगड हे मुंबई गोवा हायवे पासून अंदाजे १४ कि. मी.अंतरावरती तळा शहरात वसलेले आहे.

या गडावरती विद्युत सुविधा नसल्याने सोलर पॅनलचे खांब उभे करून दिवे लावावेत अशी अपेक्षा पर्यटकांतून होताना दिसत आहे.त्याच बरोबर तळगडावरती



कमीत कमी एकतरी निवारा शेड पावसापासून संरक्षणाच्या दृष्टीने पुरातत्व विभागाने लक्ष घालून उभारावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.तळगड हा इतिहासाची साक्ष देत आज उभा आहे.तळगडाचे ऐतिहासिक महत्व हे अतिशय बोलके आहे.छत्रपती शिवाजी महाराजांकडे पुरंदरच्या तहात जे १२किल्ले होते त्या १२ किल्ल्यां पैकी तळगड हा एक किल्ला होता.या किल्ल्याची तटबंदी ही मजबूत व सुरक्षेच्या दृष्टीनेही मजबूत आहे असा तळगड हा किल्ला आहे.

तळगडाच्या पायथ्यापर्यंत तळा शहरातून पुसाटी कडून रस्ता झाला आहे.तेथून पायऱ्यांनी पायी गडावर चालत जावे लागते,थोड्याअंतरावर हनुमानाची दगडात कोरलेली मूर्ती आहे.त्याला हनुमान दरवाजा अथवा महाद्वार म्हटले जाते.तेथेच पाणी साठा आहे.तेथून पुढे पुन्हा पायऱ्यांनी चालत जावे लागते.गडावर गेल्या नंतर तेथील काही वास्तुंचे अवशेष पहावयास मिळतात. छोटे श्रीशिवमंदिर आहे.या गडावर फिरताना छत्रपती शिवाजी महाराजांची आठवण प्रत्येक पर्यटकाला येतेच असा हा तळगड आहे.तळगडावरून तळा शहराचा निसर्गाने नटलेला परिसर एक आकर्षण ठरते.

# बारवई वरचीवाडीत सभापतींचा पाहणी दौरा

## समस्या मार्गी लावण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील बारवई ग्रामपंचायत हद्दीत बारवई वरचीवाडी येथे पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, सदस्य अस्मिता पाटील तसेच सामाजिक कार्यकर्ते अनंत पाटील, माजी सरपंच सदाशिव वास्कर यांनी भेट देऊन तेथील आदिवासी बांधवांचे प्रश्न समजून घेतले आणि उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

या अनुषंगाने त्यांचा महत्त्वाचा पाण्याचा प्रश्न सोडवण्याबाबत निर्णय घेण्यात आला. प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत कार्यालय येथेही भेट देण्यात आली. यावेळी सरपंच नियती बाबरे, सदस्य रूपाली मुंडे, कीर्ती दळवी, ग्रामपंचायत अधिकारी सविता राठोड, धनंजय निकम, विवेक वास्कर, पाणीपुरवठा शाखा अभियंता



निरंजन बनकर, अमित शिंदे, नारायण पडवळ, सचिन पडवळ, निलेश बाबरे, समीर दळवी, नामदेव मुंढे, जगन्नाथ पाटील, मंगेश गोजे, महादू पाटील, सुनील दळवी, मधुकर दळवी, मारूती कातकरी, अजय कातकरी, चंद्रा कातकरी, काळूराम कातकरी, सुदाम पवार, धृपती कातकरी, भारती कातकरी, लक्ष्मी कातकरी, लता कातकरी, रंजना पवार, भागी कातकरी, काजल कातकरी आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय ऑलंपियाड परीक्षेत रूद्र, विस्मयची चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामाठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी इंडियन टॅलेंटेड ऑलंपियाड परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले. चौथीचा विद्यार्थी रूद्र पाटील व विस्मय माने या दोघांनीही गणित विषयात बाजी मारत राष्ट्रीय स्तरावर पारितोषिके मिळवली. त्यांना प्रशस्तिपत्रकासह रोख रक्कम बक्षीसही देण्यात आले.

रुद्र पाटीलला १२००, तर विस्मय मानेला ७०० रुपयांचे बक्षीस प्राप्त झाले. विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धा परीक्षांसाठी तयार करण्याच्या उद्देशाने विद्यालयामार्फत विविध बाह्य परीक्षा घेतल्या जातात. त्यापैकीच इंडियन टॅलेंट ओलंपियाड एक असून यात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग



नोंदवला होता.

विद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी अशा परीक्षांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले. तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या.

यावेळी रयतचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप, रयतचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथील मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी उपस्थित होते. पर्यवेक्षिका सारिका लांजूडकर, नेहा खन्ना, कोमल गायकवाड तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

## कर्नाळ्यात वीज, रोजगार आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांचा वाढदिवस दरवर्षी सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो. यावर्षीदेखील ही परंपरा कायम राखत कर्नाळा विभागात बानूबाई वाडी, खैराट वाडी आणि आखाडा वाडी येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वांसाठी वीज मीटर आणि आकडामुक्त वाडी हा उपक्रम आयोजित करून या वाडीतील २६ आदिवासी कुटुंबांना कर्नाळा ग्रामपंचायतीच्या मागासवर्गीय निधीतून वीज मीटर मंजूर करून त्याचे लोकार्पण रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

आदिवासी विकास प्रकल्पातून सहा आदिवासी महिला लाभार्थ्यांना कुक्कुटपालन व्यवसाय, एक शिलाई मशीन आणि आखाडा वाडी येथील आदिवासी महिला बचत गटाला झेरॉक्स मशीन मंजूर करून त्या व्यवसायाचे उद्घाटन पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बानूबाई वाडी येथे १०० हापूस कलमांच्या रोपांचे वृक्षारोपण करून ग्रामपंचायत निधीतून नूतनीकरण केलेल्या समाजमंदिराचे लोकार्पण करण्यात आले. याचवेळी गेली कित्येक वर्षे पंचायत समितीत बांधकाम विभागात शाखा अभियंता म्हणून प्रामाणिकपणे जनसेवा करून सेवानिवृत्त झालेले विनायक ताटरे यांचा आदिवासी ग्रामस्थ आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांकडून नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी पनवेल पंचायत समिती उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, स्वीय सहाय्यक प्रवीण कालबागे, केळवणे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष विद्याधर जोशी, वावेघर जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष अविनाश गाताडे, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रदीप सोळस्कर, ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल पाटील, तुळसा हापसे, सुनीता वाघमारे, सुरेश हापसे, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत, अनंता माळी, शांताराम वाघमारे आणि मोठ्या संख्येने विभागातील आदिवासी ग्रामस्थ उपस्थित होते.

## शाळांना देणगी, विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सारडे रायगड जिल्हा परिषद शाळेला समर्थ चषक क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून जो नफा मिळेल तो जिल्हा परिषदेच्या शाळांना देणगी स्वरूपात देण्यात येईल, असे जाहीर केले होते. त्याची पूर्तता करताना समर्थ चषक आयोजक मुकुंद गावंड व टीम आणि उरण भारतीय जनता पक्ष यांच्यातर्फे ही देणगी देण्यात आली तसेच खोपटे गावातील दानशूर व्यक्तिमत्त्व उद्योगपती देवेंद्र पाटील यांच्यामार्फत वह्या वाटपाचा कार्यक्रम झाला.

यावेळी उरण तालुक्याचे उपनगराध्यक्ष रवी भोईर, माजी जिप सदस्य विजय भोईर, महाराष्ट्र उपाध्यक्ष चंद्रकांत घरत, ग्रामीण अध्यक्ष धनेश गावंड, महिला मोर्चा अध्यक्ष राणी म्हात्रे, विभागीय अध्यक्ष शशिकांत पाटील, उद्योगपती देवेंद्र पाटील, भाई प्रशांत ठाकूर, भाई अमित म्हात्रे, नवनाथ भाई, समीर पाटील, वशेणी ग्रामपंचायत सदस्य संग्राम पाटील, संदेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य रसिक पाटील, महिला नेत्या सीमा घरत, जासई गाव अध्यक्ष मनीषा घरत, कोप्रोली गाव अध्यक्ष निशा म्हात्रे, शामिता ठाकूर, संगीता गायकवाड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन सरपंच रोशन पाटील, माजी सरपंच संदीप पाटील, ग्रामपंचायत सदस्य अस्मिता म्हात्रे, तुळशीराम पाटील, हितेश म्हात्रे, संतोष माळी यांनी केले होते.



## १० शाळांमधील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी उरण तालुका ग्रामीण आणि मयूर घरत, उपाध्यक्ष-भाजप युवा मोर्चा उरण तालुका, निलेश पाटील, भाजप कार्यकर्ता यांच्या संयुक्त विद्यमाने उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (दि. १७) चिरले पंचायत समितीमधील १० रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

वेश्वी गाव, वेश्वी कातकरवाडी, दादरपाडा, चिरले गावठाण, जांभूळपाडा, विंधणे, धाकटीजुई, बोरखार आणि टाकीगाव या गावांतील शाळांमध्ये १५० वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून भाजप रायगड जिल्हा चिटणीस शरद ठाकूर, भाजप जासई विभाग अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष उरण तालुका ग्रामीण शैलेश गावंड, भाजप उरण तालुका चिटणीस प्रसाद पाटील, माजी सरपंच विलास पाटील, सरपंच अजित पाटील, माजी सरपंच राजू घरत, सदस्य लक्ष्मीताई, दिघोडे गाव अध्यक्ष राजेश पाटील, भाजप कार्यकर्ता राकेश मढवी , रुपेश मुंबईकर, विश्राम मोहिते, ज्ञानेश्वर माळी, रूपेश कोळी आदी उपस्थित होते.

## जिल्हा परिषदेच्या पुनाडे शाळेला देणगी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पुनाडे रायगड जिल्हा परिषद शाळेला समर्थ चषक क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून जो नफा मिळेल तो जिल्हा परिषदेच्या शाळांना देणगी स्वरूपात देण्यात येईल, असे जाहीर केले होते.

त्याची पूर्तता करताना समर्थ चषक आयोजक मुकुंद गावंड व टीम आणि उरण भारतीय जनता पक्ष यांच्यातर्फे ही देणगी देण्यात आली. तसेच खोपटे गावातील दानशूर व्यक्तिमत्त्व उद्योगपती देवेंद्र पाटील यांच्यामार्फत वह्यावाटपाचा



कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी उरण तालुक्याचे उपनगराध्यक्ष रवी भोईर, माझी जिप सदस्य विजय भोईर, ग्रामीण अध्यक्ष धनेश गावंड, महिला मोर्चा अध्यक्ष राणी म्हात्रे, विभागीय अध्यक्ष शशिकांत पाटील, सारडे सरपंच रोशन पाटील, उद्योगपती देवेंद्र पाटील, भाई प्रशांत ठाकूर, अमित म्हात्रे, नवनाथ भाई, समीर पाटील, वशेणी ग्रामपंचायत सदस्य संग्राम पाटील, जासई गाव अध्यक्ष मनीषा घरत, कोप्रोली गाव अध्यक्ष निशा म्हात्रे, संगीता गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन संदेश पाटील, रसिक पाटील यांनी केले होते.

## उलवेच्या चिमुकल्यांची वंडर्स पार्क सहल : निसर्ग व शिक्षणाचा संगम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य दिले जाते. पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळावे या उद्देशाने पूर्व प्राथमिक विभागातील चिमुकल्यांसाठी नेरूळ येथील वंडर्स पार्क येथे आनंददायी Field Trip/ Nature Walkचे आयोजन शनिवारी (दि. १८) करण्यात आले. शाळा विद्यार्थ्यांना आनंददायी, कृतीआधारित आणि अनुभवाधारित शिक्षण देण्यावर भर देते.

सकाळी उत्साहाने सज्ज झालेल्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सहलीला प्रस्थान केले. पार्कमध्ये पोहचताच हिरवागार परिसर, स्वच्छ वातावरण, रंगीबेरंगी फुले, विविध प्रकारची झाडे आणि मोकळी जागा पाहून विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

नेचर वॉकदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध वनस्पती, झाडे, पक्षी आणि निसर्गातील सौंदर्याचे बारकाईने निरीक्षण केले. शिक्षकांनी मुलांना पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, झाडांचे महत्त्व आणि निसर्गाशी मैत्री करण्याचे महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगितले. या अनुभवातून मुलांमध्ये निरीक्षणशक्ती, जिज्ञासा आणि निसर्गाविषयी प्रेम अधिक दृढ झाले.

वंडर्स पार्कमधील जगातील सात आश्चर्यांच्या प्रतिकृती पाहताना विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने माहिती ऐकली. या प्रतिकृतींमुळे मुलांना जागतिक वारशाची प्राथमिक ओळख मनोरंजक पद्धतीने झाली तसेच पार्कमधील खेळाच्या साधनांवर खेळताना मुलांनी मनमुराद आनंद लुटला. सहकार्याची भावना विकसित केली आणि मित्रांसोबत आनंददायी क्षण अनुभवले.

ही शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, आनंद आणि अविस्मरणीय आठवणींचा सुंदर संगम ठरली.



## कोमल भोईर यांना मानद डॉक्टरेट प्रदान


**पनवेल** : समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या कोमल मोहनिश भोईर यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत "व्हिजनरी डॉक्टरेट ऑनर इन सोशल वर्क" हा प्रतिष्ठेचा मानद डॉक्टरेट सन्मान प्रदान करण्यात आला. विविध सामाजिक उपक्रमांद्वारे मानवतेची सेवा, समाजाप्रति असलेली निष्ठा आणि लोककल्याणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची नोंद घेऊन हा सन्मान बहाल करण्यात आला.



**पनवेल : विठ्ठलनामाचा अखंड गजर, भक्तिभावाचे वातावरण आणि सायकलिंगद्वारे आरोग्य व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पनवेल ते पंढरपूर सायकल वारी शुक्रवारी पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून उत्साहपूर्ण वातावरणात मार्गस्थ झाली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सहकार्यातून ही वारी आयोजित करण्यात आली आहे.**

# यशाचा सोहळा

## सामना, बनवाबनवी, माहेरची साडी... आणि 'देऊळ बंद २'चा









झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

यश हे सर्वाधिक ताकदवान टॉनिक... चित्रपटाच्या जगात यशाचे नाणं कायमच चालणारं. सर्वांनाच हवेहवेसे वाटणारे. जपून ठेवावे असे. उगाच नाही म्हणत एक पिक्चर सुपरडुपर हिट होने दे... चित्रपटाच्या यशाची वाट रसिक प्रेक्षकांच्या आवडीनिवडीवर अवलंबून असते. रसिकांना चित्रपट आवडला रे आवडला, आजच्या मल्टीप्लेक्स युगात रात्री दहा वाजून पंचावन्न मिनिटांचा शोदेखील हाऊसफुल्ल गर्दीत टाळ्या शिट्ट्यांनी एन्जॉय केला जातो. सोशल मीडियात अनेक जण व्यक्त होतात आणि पिक्चर सुपरडुपर हिट है तो सेलिब्रेशन तर हवेच.

'देऊळ बंद २'च्या यशाचा असाच उत्फूर्त आणि लक्षवेधक सोहळा पुणे शहरात साजरा झाला. आपला हा चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि ते करताना हा चित्रपट चर्चेत ठेवण्यासाठी दिग्दर्शक आणि कलाकार प्रवीण तरडे याने कमालीची मेहनत घेतली आणि त्याचं गोड फळ त्याला मिळाले. आपला चित्रपट फोकसमध्ये राहण्यासाठी आपणच जोरदार शोरदार प्रयत्न करायला हवेत हे प्रवीण तरडेने अधोरेखित केले. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरही त्याच्या यशाचा वेग आणि वेध कायम ठेवायचा असतो.

'गोष्ट मोठी शंभर कोटी' अशा आकर्षक टॅगलाईनने हा सोहळा रंगला. म्हटलं तर हा 'प्रवीण तरडे वन मॅन शो'. त्याने या यशाबद्दल तयार केलेल्या एका क्लिपमध्ये आपल्या चित्रपटाच्या जवळपास सर्वच तंत्रज्ञाचे विशेष कौतुक केले हे उल्लेखनीय. चित्रपट माध्यम आणि व्यवसायात पडद्यामागची टीम खूप महत्त्वाची असते, अशा कौतुकाने त्यांचा हुरूप वाढतो. या यशाचे वैशिष्ट्य म्हणजे, त्याच्या यशाचा लाभ गरजू शेतकऱ्यांना आणि त्यांच्या मुलांना देण्यात येणार आहे. चित्रपटाच्या यशातून सामाजिक बांधिलकी जपली जात आहे.

मराठी चित्रपटाच्या यशाचा सोहळा खूप वेगळा असतो, त्यात अनावश्यक दिखावूपणा नसतो असा माझा दीर्घकालीन सुखद अनुभव, खूप आठवणी आहेत. काही सांगायला हव्यात. सतिश कुलकर्णी निर्मित आणि सचिन पिळगावकर दिग्दर्शित 'गंमत जंमत'(१९८७)चा रौप्य महोत्सवी यशाचा सोहळा आजही मला आठवतोय.

जुहू समुद्रकिनारा लगतचे हॉटेल सन अ‍ॅण्ड सॅण्ड हा एकेकाळचा हिंदी चित्रपटसृष्टीचा सेलिब्रेशनचा जणू सर्वोत्तम हुकमी स्पॉट. (वा अड्डा) सत्तरच्या दशकातील चित्रपटात ते दिसते. याच प्रतिष्ठित स्पॉटच्या प्रशस्त हॉलमध्ये हा सोहळा रंगला. या पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आलेला मराठी चित्रपटाचा हा पहिला सोहळा. त्यानंतर अमिताभ बच्चन यांचे रंगभूषाकार दीपक सावंत यांनी निर्माण केलेल्या 'आक्का' चित्रपटाचा जया बच्चन यांच्या शुभ हस्ते ध्वनिफित प्रकाशन वगैरे काही मोजक्याच मराठी चित्रपटांचे सोहळे येथे झाले. सतिश कुलकर्णी निर्मित आणि सचिन पिळगावकर दिग्दर्शित 'एकापेक्षा एक' (१९९०) या चित्रपटाच्या यशाचा सोहळा जुहू येथील सेन्टॉर हॉटेलमध्ये अमिताभ बच्चनच्या शुभ हस्ते कलाकार आणि तंत्रज्ञांना स्मृतीचिन्हे देत रंगला.

राजकमल कलामंदिर (युवा विभाग) निर्मित, किरण शांताराम निर्मित आणि सचिन पिळगावकर दिग्दर्शित 'अशी ही बनवाबनवी' (१९८८) हा सर्वकालीन सुपरहिट चित्रपट. कितीही वेळा कुठूनही पाहावा तोच मजेशीर टाईमपास. त्यातील वसंत सबनीस यांच्या खुमासदार शैलीतील पटकथा संवाद आणि सर्वच कलाकारांचा उत्तम टायमिंग साधलेला उत्फूर्त अभिनय यांचे गणित म्हणजे मनोरंजनाची बेरीज. मला आठवतंय या चित्रपटाचा यशाचा सोहळा दोनदा झाला. रौप्यमहोत्सवी सोहळा राजकमल कलामंदिर स्टुडिओत रंगला आणि सुवर्ण महोत्सवी सोहळा जुहू येथील सेन्टॉर हॉटेलच्या स्वीमिग पुलाच्या प्रशस्त हिरवळीवर रंगला, त्यातही विशेष म्हणजे चित्रपटसृष्टीतील आदर्श ठेवावा अशा चित्रपती व्ही. शांताराम आणि दिलीपकुमार यांच्या खास उपस्थितीत तो रंगला. अशा दोन लिजण्डसना एकत्र पहावे, ऐकावे, अनुभवावे हा तर एक वैशिष्ट्यपूर्ण अविस्मरणीय क्षण. मीडियाने मला काय दिले, तर हे असे भरपूर सकारात्मक दृष्टिकोन देणारे लाईव्ह अनुभव दिले. "अशी ही बनवाबनवी"च्या यशाची उंची या सोहळ्यात त्यात जाणवली. जगभरातील विविध भाषांतील चित्रपटांच्या यशाचे सोहळे अनेक. त्यात वेगळेपण असते ते हे असे.

मराठी चित्रपटाच्या यशाच्या सोहळ्यात विजय कोंडके निर्मित आणि दिग्दर्शित 'माहेरची साडी' (१९९१) चे खणखणीत यश काय वर्णावे? आजही या चित्रपटाच्या विशेषतः ग्रामीण भागातील यशाचे किस्से, कथा, गोष्टी रंगवून खूलवून सांगितल्या जातात. अशा गोष्टींतून यशस्वी चित्रपट एका पिढीकडून पुढच्या पिढीसोबत चालत राहतात. चित्रपट संस्कृतीतील हेदेखील एक वैशिष्ट्य. 'माहेरची साडी' च्या यशाचे सेलिब्रेशन अंधेरीतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये साजरे केले. इंदिरा काँग्रेसचे खासदार सुनील दत्त हे विशेष पाहुणे म्हणून होते आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर निर्माता आणि दिग्दर्शकांना खास आमंत्रित करण्यात आले होते. मराठी चित्रपटाच्या यशाची गोष्ट हिंदी चित्रपटसृष्टीलाही ज्ञात होतीच, पण आपल्या आनंदात त्यांनाही सहभागी करून घेतले. दादा कोंडके यांनी या चित्रपटाच्या यशाचे भरभरुन कौतुक केले.

दादा कोंडके यांच्या "पळवापळवी"(१९९०) या चित्रपटाच्या यशाचा सोहळा मरीन लाइन्स येथील मराठी चित्रपटसृष्टीच्या तेव्हच्या एका तारांकित हॉलमध्ये रंगला आणि विशेष म्हणजे जितेंद्र प्रमुख पाहुणा होता. दादांनी या सोहळ्यात अशोक सराफ, सचिन पिळगावकर आणि महेश कोठारे यांनाही खास आमंत्रित करुन मराठी चित्रपटसृष्टीतील जणू एकोपा दाखवला. आजही सोशल मीडियात या चौघांचा फोटो पाह्यला मिळतोय आणि आजच्या जेन झी पिढीला त्या विशेष क्षणाची माहिती मिळतेय. या सोहळ्याच्या दिवशी लक्ष्मीकांत बेर्डे कोल्हापूरला शूटींग करत असल्याने उपस्थित नव्हता. अन्यथा त्या काळातील चित्रपट रसिकांचे आवडते टॉप फाईव्ह एकत्र असा अतिशय दुर्मीळ योग जमून आला असता. हा क्षण हुकल्यामुळे लक्ष्मीकांत बेर्डेही हळहळला असे त्याच्या एका भेटीत मला जाणवले. महेश कोठारे अभिनित, निर्मित आणि दिग्दर्शित धूम धडाका, दे दणादण, झपाटलेला, थरथराट यांच्या यशाचे सोहळेही 'जबरदस्त'.

रामदास फुटाणे निर्मित आणि डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित "सामना"(१९७५) हा चित्रपट अनेक कारणांमुळे नेहमीच चर्चेत असतो. निळू फुले आणि डॉ. श्रीराम लागू यांच्या अभिनयाचा जबरदस्त 'सामना' हेही एक कारण आहे आणि १९ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू करण्यात आली आणि काही दिवसांनी या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली याही कारणास्तव हा चित्रपट चर्चेत राहिला. (सामना तसेच गुलजार दिग्दर्शित 'आन्धी' वगैरे काही चित्रपट या बंदीमुळे चित्रपटगृहातून उतरवण्यात आले.) एकोणीस महिन्यानंतर आणिबाणी उठली आणि हे चित्रपट पुन्हा प्रदर्शित होताना त्यांच्याभोवती एक वैशिष्ट्यपूर्ण वलय आणि वजन प्राप्त झाले होते. तेव्हापासून हे चित्रपट कायमच गाजत असतात. 'सामना' पुन्हा पुन्हा प्रदर्शित होताना त्याला हाऊसफुल्ल गर्दी होऊ लागली. एकदा लोकप्रिय झालेला चित्रपट कायमच लोकप्रिय असतो.

'सामना' चित्रपटाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त गतवर्षी पुणे शहरातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात आयोजित करण्यात आलेल्या खास खेळाला अक्षरशः प्रचंड गर्दी, इतकी की अखेर दरवाजा बंद करून घ्यावा लागल्याने अनेक रसिक सभागृहाच्या बाहेरच राहिले आणि त्याची चक्क बातमी झाली. यावेळच्या खास चर्चासत्रात रामदास फुटाणे, डॉ. मोहन आगाशे, विलास रकटे आणि मी, अशा आम्ही सहभाग घेतला. या सोहळ्यामुळे जुन्या चित्रपटाच्या यशाचा असा चाळीस अथवा पन्नास वर्षानी खास सोहळा आयोजित करण्याचा ट्रेंड आला. प्रत्येक यश काहीना काही देत असते ते हे असे. सामना ते देऊळ बंद २ या वाटचालीत अनेक मराठी चित्रपट लोकप्रिय ठरले. सत्तरच्या दशकात एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्स आणि तंबू थिएटर्स ही चित्रपट पाहण्याची माध्यमे होती. दूरदर्शन माध्यम नवीन होते. १९८२ साली एशियाडच्या वेळी आपल्या देशात रंगीत दूरचित्रवाणी आणि चित्रफित (व्हिडिओ) आला. गावोगावी व्हिडिओ थियेटर्स आली. टूरिंग टॉकिजला एक प्रकारची स्पर्धा निर्माण झाली. नव्वदच्या दशकात उपग्रह वाहिन्यांच्या आगमनाने पडद्यावरचा चित्रपट घरात आला. नवीन शतक सुरू झाले आणि मोबाईल, मल्टीप्लेक्स आले. ते काही वर्षांनी रुजले. मग ओटीटी प्लॅटफॉर्म आला. त्यावर जगभरातील अनेक देशांतील विविध भाषांतील चित्रपट वेबसिरीज घरबसल्या पाहायला मिळताहेत. एकीकडे मराठी चित्रपटाच्या यशापयशाचे गणित मांडले जात असताना याही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात आणि अशा बदलत्या सामाजिक सांस्कृतिक माध्यम वातावरणात यशस्वी ठरलेल्या मराठी चित्रपटांचे सोहळे असे आठवणीत राहिले.




## खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर



भारतीय खगोलीय भौतिकी विज्ञान व गणितज्ञ जयंत विष्णू नारळीकर यांची आज जयंती. त्यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील विष्णु वासुदेव नारळीकर हे रँग्लर असून ते बनारस हिंदू विद्यापीठात व पुणे विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक होते. १९५७ साली जयंत नारळीकर यांनी बनारस हिंदू विद्यापीठाची बी.एस्सी. पदवी मिळविली. १९५७ मध्ये त्यांना केंब्रिज येथील उच्च शिक्षणासाठी जे. एन. टाटा शिष्यवृत्ती मिळाली. ते केंब्रिज विद्यापीठातील गणितामधील ट्रायपॉस ही परीक्षा उत्तीर्ण झाले. १९५९ साली ते रँग्लर झाले. त्यांनी केंब्रिज विद्यापीठामधून बी.ए. (१९६०), एम.ए. (१९६४), पीएच.डी. (१९६३) आणि डी.एस्सी. (१९७६) या पदव्या संपादन केल्या. १९६०–६१ मध्ये त्यांना डब्ल्यू. ए. मीक शिष्यवृत्ती मिळाली.

नारळीकर हे १९६३पासून रॉयल अ‍ॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे आणि केंब्रिज फिलॉसॉफिकल सोसायटीचे फेलो आहेत. ते १९६२–६३मध्ये फिट्झ विल्यम हाऊस, केंब्रिज येथे गणितीय अध्ययनाचे संचालक किंग्ज कॉलेज, केंब्रिज येथे बेरीरॅम्से फेलो (१९६३–६९) आणि वरिष्ठ संशोधक फेलो (१९६९–७२) होते. १९६७ ७२मध्ये ते केंब्रिज विद्यापीठातील इन्स्टिट्यूट ऑफ थिऑरेटिकल अ‍ॅस्ट्रॉनॉमी या संस्थेच्या अध्यापन व संशोधन वर्गाचे सदस्य होते. १९७३–७५ या काळात ते जवाहरलाल नेहरू फेलो होते. १९७४ पासून ते इंडियन अ‍ॅकॅडमी ऑफ सायन्सेसचे फेलो आहेत. १९७६ साली 'इंडियन नॅशनल सायन्स अ‍ॅकॅडमी'ने फेलोशिप देऊन त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. ऑक्टोबर १९७२पासून ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई येथे खगोलीय भौतिकीचे प्राध्यापक म्हणून कार्य करीत आहेत.

फ्रेड हॉईल, एच. बाँडी व टी. गोल्ड यांनी पूर्वी मांडलेल्या विश्वोत्पत्तिशास्त्रातील स्थिर अवस्था उपपत्तीच्या संदर्भात नारळीकरांनी संशोधन केले. हॉईल व नारळीकर यांनी विश्वातील द्रव्याच्या निर्मितीसंबंधी गणितीय विवरण केलेले होते. याकरिता त्यांनी ऋणात्मक ऊर्जेची संकल्पना उपयोगात आणली. गुरुत्वामुळे एखाद्या वस्तूच्या शीघ्रतेने होणाऱ्या आकुंचनाला गुरुत्वीय अवपात म्हणतात. हॉईल व नारळीकर यांनी हा अवपात ऋणात्मक ऊर्जेची शक्ती वापरून थांबविता येतो असे दाखविले. तथापि गुरुत्वाकर्षणातील ऋणात्मक ऊर्जेला तोंड देणारी दुसरी ऋणात्मक शक्ती हॉईल नारळीकर यांनी तर्क केल्याप्रमाणे विश्वात असेल काय, हा अद्यापि न सुटलेला प्रश्न आहे.

हॉईल व नारळीकर यांनी ११ जून १९६४ रोजी लंडनच्या रॉयल सोसायटीपुढे गुरुत्वाकर्षणाचा एक नवा सिद्धांत मांडला. यात अर्न्स्ट माख यांच्या तत्त्वाला (कोणत्याही कणाची गती ही विश्वातील इतर द्रव्याच्या संदर्भात लक्षात घेतली तरच अर्थपूर्ण ठरते) गणितीय रूप देऊन आइन्स्टाइन यांच्या गुरुत्वाकर्षणाशी त्याची सांगड घालून देण्यात आली. जडत्व हा वस्तूचा मौलिक गुणधर्म नसून त्याचा विश्वरचनेशी संबंध आहे, असे या सिद्धांतात प्रतिपादन करण्यात आले.

नारळीकर आणि त्यांचे सहकारी के. एम. व्ही. अप्पाराव यांनी विश्वामध्ये कृष्ण विवरांप्रमाणे श्वेत विवरे अस्तित्वात आहेत आणि प्रत्यक्षात ती विवरे नसून द्रव्य आणि ऊर्जा यांची उगमस्थाने आहेत, असे मत प्रतिपादन केले. केंब्रिज विद्यापीठाने नारळीकर यांना ज्योतिषशास्त्रातील टायसन पदक (१९६०), स्मिथ पारितोषिक (१९६२) आणि अ‍ॅडम्स पारितोषिक (१९६७) देऊन त्यांचा सन्मान केला. १९६५ साली भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा किताब दिला. १९७३ मध्ये मुंबईमधील इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने त्यांना सुवर्ण महोत्सवी सुवर्ण पदक दिले.

खगोलीय भौतिकी, गुरुत्वाकर्षण, विश्वोत्पत्तिशास्त्र इ. विषयांवरील त्यांचे ७०हून अधिक संशोधनात्मक निबंध आणि लेख प्रसिद्ध झाले आहेत. याखेरीज त्यांनी काही विज्ञान कथा लिहिलेल्या असून वैज्ञानिक विषयांवर सुलभ भाषेत व्याख्याने देण्यासंबंधी त्यांची ख्याती आहे. अशा या महान व्यक्तिमत्त्वाचे २० मे २०२५ रोजी निधन झाले.

**–वि.ल. सूर्यवंशी**

# केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन




आधुनिक शेतीमध्ये वाढलेला रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर जमिनीचा पोत आणि मानवी आरोग्यासाठी घातक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर निसर्गाचा समतोल राखत, पारंपरिक आणि रसायनमुक्त शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना मंजूर केली आहे. महाराष्ट्रात या मिशनची अंमलबजावणी भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापण यंत्रणा (आत्मा) कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभावीपणे केली जात आहे. नैसर्गिक शेती ही पूर्णपणे पशुधन आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या संसाधनांवर आधारित असून ती भारतीय परंपरेत रुजलेली एक सुरक्षित पद्धत आहे. शेती आणि शेतकरी या दोन्हीच्या उन्नतीसाठी कटिबद्ध असणाऱ्या शासनाने अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहेच, पण यासोबतच राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनला चालना देऊन रासायनिक खते आणि रसायने यांच्यावरचे शेतकऱ्यांचे अवलंबित्व कमी करण्यासाठीही चालना देण्यात येत आहे.

शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करणे, बाह्य निविष्ठा खरेदी न करणे, निसर्गावर आधारित शाश्वत शेती प्रणाली विकसित करणे, मातीचे आरोग्य आणि सुपीकता पुनरुज्जीवित करणे, पाण्याची गुणवत्ता वाढवणे व जैवविविधता जतन करणे आणि शेतकरी, त्यांचे कुटुंब आणि ग्राहकांना सुरक्षित, आरोग्यदायी आणि पौष्टिक अन्न पुरवणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेसाठी केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के आहे.

प्रति शेतकरी एक एकर क्षेत्राचा लाभ द्यावयाचा असून त्यानुसार प्रति गट १२५ लाभार्थी निवड. प्रति गट /क्लस्टर २ कृषी सखी (Community Resource Persons–CRP) नियुक्त करणे. कृषी सखी (CRP) यांना केव्हिके स्तरावर प्रशिक्षण देणे. गावपातळीवर जन जागृती कार्यक्रमाचे आयोजन. सहभागी शेतकरी यांना प्रशिक्षण देणे. सहभागी शेतकऱ्यांच्या शेताचे नैसर्गिक शेती प्रमाणीकरण करणे. नैसर्गिक शेती करणाऱ्या इच्छुक शेतकऱ्यांसाठी अभ्यास साहित्य, फार्म डायरी, FAQ पुस्तिका इ. उपलब्ध करून देणे. कृषी सखी (CRP) यांना मोबाईल उपकरणांसाठी मदत. भारतीय प्राकृतिक जैव–इनपुट संसाधन केंद्राची (BRC) स्थापना करणे. योजने अंतर्गत जिल्ह्यास प्राप्त लक्षांक एकूण ५० गटांचे (क्षेत्र २७०० हेक्टर) लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी नवीन सहा शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती करण्यासाठी प्रवृत्त करावयाचे आहे. योजनेंतर्गत समाविष्ट घटक आहेत.

स्थापन केलेले शेतकरी गट ५४, एकूण शेतकरी निवड ६७५० क्षेत्र २७०० हे. निवड केलेले कृषि सखी /सीआरपी १०८, निवड केलेल्या एकूण १०८ कृषि सखींचे केव्हिके स्तरावर ५ दिवसीय निवासी प्रशिक्षण पूर्ण. गावपातळीवर एकूण २१६ जन जागृती कार्यक्रमाचे आयोजन. सहभागी शेतकरी एकूण ६७५० यांना केव्हिके शास्त्रज्ञामार्फत प्रशिक्षण देण्यात आले. सहभागी शेतकरी एकूण ६७५० यांना केव्हिके शास्त्रज्ञामार्फत प्रशिक्षण देणेत आले. सहभागी शेतकरी एकूण ६४३० यांना खरीप व रब्बी हंगाम मध्ये प्रोत्साहनपर अनुदान एकूण रक्कम रु. २५७.२० लाख इतके अनुदान वर्ग केले आहे. अभियान अंतर्गत ५४ गटांमधून सहभागी ६७५० शेतकऱ्यांच्या शेताचे एकूण २७०० हेक्टर क्षेत्राचे नैसर्गिक शेती प्रमाणीकरण करून त्यांना PGS–INDIA NATURAL सेंद्रिय प्रमाणपत्र वितरण करण्यात आले आहे. सन २०२५–२६ मध्ये अभियान अंतर्गत वरील प्रमाणे विविध बाबीवर एकूण रक्कम रु. ३५४.८५ लाख इतके अनुदान खर्च करण्यात आले. अशी भरीव कामे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापण यंत्रणा (आत्मा) सातारा कार्यालयाने केली आहेत. तसेच सन २०२६–२७ मध्ये १८७५ हे. क्षेत्र वर १२५ एकर प्रतिगट याप्रमाणे एकूण १५ गट स्थापन करण्याचे नियोजनही केले आहे.

आत्मा कार्यालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या प्रभावी उपक्रमामुळे जिल्ह्यातील शेतीला आता एक नवी, शाश्वत दिशा मिळाली आहे. रासायनिक शेतीच्या विळख्यातून मुक्त होऊन शेतकरी आता निसर्गाच्या कुशीत समृद्धी शोधत आहेत. सेंद्रिय प्रमाणपत्राच्या माध्यमातून स्थानिक शेतकऱ्यांच्या मालाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख आणि चांगला बाजारभाव मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कृषी विभागाची ही कामगिरी केवळ जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणारी नसून येणाऱ्या पिढ्यांचे आरोग्य सुरक्षित करणारी एक क्रांती ठरत आहे. निसर्ग समृद्धी आणि शेतकरी संपन्नतेचा हा मार्ग आगामी काळात अधिक प्रशस्त होईल यात शंका नाही.

**–वर्षा पाटोळे**
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

# रायगडात ९१० शेतकऱ्यांनी केली पीक विम्याची नोंदणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

पीक विमा नोंदणीसाठी दिलेली मुदत संपत आली असली तरी रायगड जिल्ह्यात आतापर्यंत केवळ ९१० शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. रायगड जिल्ह्यासाठी यांना एफको–टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे.




रायगड जिल्ह्यात खरीप हंगामात साधारणपणे ९० हजार हेक्टरवर भात आणि नाचणी पिकांची लागवड केली जाते. हे पीक प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. हवामानात सतत होणारे बदल आणि अतिवृष्टी, पूरस्थिती, वादळे यांचा पिकांच्या परिस्थितीवर गंभीर परिणाम होत असतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागते. ही बाब लक्षात घेऊन भात आणि नागली पिकांसाठी शासनाने हवामान आधारित पिक विमा योजना लागू केली आहे.

रायगड जिल्ह्यासाठी यांना एफको–टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनीची नियुक्ती केलेली आहे. कंपनीच्या माध्यमातून भात आणि नागली पिकांना पिक विमा उपलब्ध करून दिला जाणार आहे. नाचणीसाठी प्रती हेक्टर ४०० रुपये, तर भात पिकासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ६५० रुपये विम्याचा हप्ता भरावा लागणार आहे. भात पिकासाठी संरक्षित रक्कम ६५ हजार रुपये, तर नाचणी पिकासाठी संरक्षित रक्कम चाळीस हजार रुपये असणारा आहे. विमा संरक्षण योजनेचा लाभ घेण्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै असणार आहे, पण अंतिम मुदत संपण्यासाठी अवघे बारा दिवस शिल्लक असताना जिल्ह्यात जेमतेम ९१० शेतकऱ्यांनी या योजनेसाठी नोंदणी केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेकडे पाठ फिरवल्याच चित्र आहे. ग्रामसभा, गावभेटी, शेतभेटी फलक आणि विविध माध्यमातून पीक विमा योजनेबाबत जनजागृती करण्याचे काम कृषी विभागाच्या माध्यमातून केले जात आहे, मात्र तरीही शेतकऱ्यांचा अपेक्षित प्रतिसाद या योजनेला मिळू शकलेला नाही.

यंदा पिकविण्यासाठी अॅग्री स्टेक नोंदणी आणि ई–पीक नोंदणी बंधनकारक करण्यात आले आहे. एक रुपयाची पिक विमा योजना बंद करण्यात आली आहे. त्यामुळे या योजनेसाठी शेतकऱ्यांना विमा संरक्षणासाठी ज्यादा रक्कम भरावी लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. नुकसानभरपाई निकषही बदलले आहेत. डिजिटल नोंदणी, कागदपत्रांची पूर्तता यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याचा एकत्रित परिणाम पीक विमा योजनेच्या नोंदणीवर होत आहे, अशी माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

गावागावात ग्रामसभा घेऊन लोकांचे प्रबोधन करून नोंदणी करण्याचे आवाहन केले जात असल्याचेही कृषी अधिकाऱ्यांचे केले आहे. पीक विमा योजनेतील लाभार्थ्यांना नुकसान भरपाई मिळण्यास होणारा विलंब आणि जाचक अटी यामुळे शेतकऱ्यांनी या योजनेकडे पाठ फिरवल्याचे चित्र आहे. आता अधिकारीवर्गाला उरलेल्या दिवसांमध्ये व्यापक प्रमाणात जनजागृती करून या योजनेचे महत्त्व आणि त्याचे लाभ याबाबत माहिती नीटपणे अवगत करून द्यावी लागणार आहे.

# राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्काराने आमदार महेंद्र दळवी यांचा गौरव

**रेवदंडा : प्रतिनिधी**

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत अलिबागचे हेंद्र दळवी यांना 'राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार जर्नालिस्ट अँड मीडिया असोसिएशनच्या वतीने प्रदान करण्यात आला.



यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महेंद्र दळवी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना सन्मानचिन्ह, मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. त्यांच्या सामाजिक बांधिलकी आणि विविध लोकहिताच्या उपक्रमांतील उल्लेखनीय योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला.

मानपत्रात नमूद केल्याप्रमाणे, महेंद्र दळवी यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना 'राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यातून युवकांना प्रेरणा मिळत असून, समाजहितासाठी त्यांनी केलेले कार्य आदर्शवत असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर महेंद्र दळवी यांनी हा सन्मान आपल्या सहकाऱ्यांचा, पत्रकार बांधवांचा आणि जनतेने दाखविलेल्या विश्वासाचा असल्याची भावना व्यक्त केली. भविष्यातही समाजसेवेचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. या सोहळ्यास पत्रकार संघटनेचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# माणगाव पंचायत समितीत भात बियाण्यांचे वाटप; अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

**माणगाव : बातमीदार**

पंचायत समिती माणगाव येथे जिल्हा परिषद कृषी सभापती वैकुंठराव पाटील यांच्या पुढाकाराने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भातपिकांच्या पुनर्लागवडीसाठी शेतकऱ्यांना भात बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

जिल्हा परिषद सेस अनुदानातून महाबीज कंपनीचे 'चंद्रा' या जातीचे भात बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले. हे बियाणे सुमारे १२० ते १२५ दिवसांत तयार होणारे असून पुनर्लागवडीसाठी उपयुक्त असल्याचे कृषी विभागाने सांगितले.

यावेळी पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, उपसभापती मनीषा मालारे, गट विकास अधिकारी शुभदा पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी मानसी रहाटे, तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर, पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी अशोक मारकड व प्रकाश सरतापे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते शेतकऱ्यांना भात बियाण्यांचे वाटप करण्यात आले.



# कारमेल कॉन्व्हेंट स्कूलमध्ये वनमहोत्सव सप्ताह

**खोपोली : प्रतिनिधी**

कारमेल कॉन्व्हेंट स्कूल, खोपोली येथे १ ते ७ जुलै या कालावधीत वनमहोत्सव सप्ताह मोठ्या उत्साहात पर्यावरणपूरक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. स्थानिक व्यवस्थापिका ज्युली मारिया, मुख्याध्यापिका निर्मल मारिया, उपमुख्याध्यापिका सारूपिया यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तसेच वर्गशिक्षकांच्या सहकार्याने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी या सप्ताहाचे यशस्वी आयोजन केले.



संपूर्ण आठवडाभर वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती कार्यक्रम, विविध स्पर्धा तसेच वृक्षसंवर्धनाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणारे अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले. या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देत वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाची प्रेरणा देण्यात आली.

वनमहोत्सव सप्ताहाचा समारोप प्रसिद्ध वृक्षप्रेमी उषा केळबाईकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. त्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणीय, सामाजिक व मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व समजावून सांगितले.

## संजय नाईकडे रायगड प्राथमिक शिक्षणाधिकारी

**अलिबाग :** रायगड जिल्हा परिषदेमधील प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारीपदी संजय नाईकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी जिल्हा परिषदेतील प्राथमिक विभागाचा कार्यभार स्वीकारला.

रायगड जिल्हा परिषदेमधील शिक्षण विभागामध्ये कार्यरत असलेल्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांची बदली पुणे येथे करण्यात आली आहे, तर पुणे येथील प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांची नियुक्ती रायगड जिल्हा प्राथमिका शिक्षणाधिकारीपदी करण्यात आली आहे. कार्यभार स्वीकारतेवेळी गटशिक्षणाधिकारी सीताराम मोहिते, नवनाथ साबळे तसेच विविध तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षकांच्या विविध संघटनांनी प्रत्यक्ष भेटून पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत ही मालक **गरिमा मिश्रा** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **गरिमा मिश्रा** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

मिळकतीचे वर्णन–: **PU–ID : मौजे– मांडवणे (५५३६१३) (PU–ID: १८८४२६५८६२४), तालुका–कर्जत, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १९ | १ | १.७२.२० पो.ख. ०.१४.४० एकूण – **१–८६–६०** | ७.९४ |
| | | या एकूण विक्री १–८६–६० | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ.संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१० दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यास आपली लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक – १८/०७/२०२६

**सही/–**
**अॅड. निलेश बाळासाहेब झंजाड**
बी–१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०९
मो.क्र– : ९९२०४ ७५८०१



### जाहीर नोटीस
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

क्र. जन्म/रजि/एसआर ७६ /२०२६

श्री. लक्ष्मण पांडुरंग गायकवाड
रा. डोणवत, ता. खालापुर, जि. रायगड } **वादी**

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म–मृत्यु नोदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी, ता. खालापूर, जि. रायगड } **प्रतिवादी**

**विषय–जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. लक्ष्मण पांडुरंग गायकवाड, रा. डोणवत, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांचे काका कै. झिपरु संभु गायकवाड यांचा मृत्यू दिनांक ०८/११/१९७९ रोजी डोणवत, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त् न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.०९/०७/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्यानिशी दिली असे.

**ठिकाण :– खालापूर**
**दिनांक:– ०९/०७/२०२६**

शिक्का

**सही/–**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर



### जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे कराडेखुर्द, तालुका पनवेल, जिल्हा –रायगड येथील गट/सर्व्हे नंबर १३९/२ या मिळकतीच्या हद्द कायम मोजणीबाबत व शासकीय अभिलेखानुसार मोजणी करणे आवश्यक आहे त्यानुसारउप अधीक्षक भूमी अभिलेख पनवेल येथे आमचे अशिल श्री मधु देहू माळी यांनी मोजणीचा अर्ज करण्यात आलेला असून, दिनांक २१.०७.२०२६ रोजी सदर मिळकतीची मोजणीची सुनावणी करण्यात येणार आहे.

सदर मिळकतीमधील सहधाकर असलेला श्री महादेव बळवंत कुवळेकर यांचा सध्याचा पत्ता उपलब्ध नसल्यामुळे तसेच त्यांच्याशी वारंवार प्रयत्न करूनही त्यांच्याशी संपर्क साधता आलेला नाही त्यामुळे ही जाहीर नोटीस वर्तमानपत्रामार्फत प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी संबंधीत श्री महादेव बळवंत कुवळेकर यांचा सदर मिळकतीवर कोणताही हक्क, दावा, हितसंबंध किंवा आक्षेप असल्यास संबंधितांनी सुनावणीसाठी दिनांक २१.०७.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता सदर मिळकतीच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहावे किंवा त्यांच्या विधिपूर्वक अधिकृत प्रतिनिधीस उपस्थित ठेवावे. तसेच मोजणीसंदर्भात काही हरकत, दावा किंवा म्हणणे असल्यास ते आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात सक्षम प्रधिकरणास सादर करावे.

सदर दिवशी अनुपस्थित राहिल्यास किंवा कोणतीही हरकत नोंदविली नाही, तर संबंधितांना व त्यांच्या वालीवारसांना कोणताही आक्षेप नसल्याचे गृहीत धरून उपलब्ध शासकीय अभिलेख, नकाशे, फेरफार नोंदी व लागू कायदयानुसार सुनावणी व पुढील कार्यवाही अभिलेख व पुराव्यांच्या आधारे एकतर्फी करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण पनवेल**
**दिनांक १९.०७.२०२६**

**सही/–**
**अॅड्. सौ. निशिगंधा श्रीकांत माळी**
**पत्ता रूम नंबर ३०२, बेबीका आपार्टमेंट,**
**व्ही. के. हायस्कूल मागे, आळी,लाईन**
**पनवेल ४१०२०६. मो. नं.९१३६११४६१५,**
Email id:– adv.nsmali@gmail.com



### जाहीर नोटीस
**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

१. श्री. वामन नामा सिनारे, २. सौ. जमुना पांडरंग वास्कर
३. श्री. रमेश नामा सिनारे, ४. श्री. प्रेमनाथ मेघनाथ सिनारे
५. श्री. अनंता नामा सिनारे, ६. सी. मधुरा नारायण पाटील
सर्व रा.दुंदरे (दुंदराई) ता. पनवेल. जि. रायगड **वादी**

**विरुध**

१. श्रीमती. चिनुबाई रेवाशंकर भट
२. श्री. नटवरलाल रेवाशंकर भट
३. श्री. प्रभाकर रेवाशंकर भट
४. श्री. बळवंतलाल रेवाशंकर भट
५. श्री. मणीलाल रेवाशंकर भट
सर्व रा. दुंदरे, ता. पनवेल, जि. रायगड
६. मंडळ अधिकारी मोर्बे, ता. पनवेल, जि.रायगड
७. तलाठी सजा मालडुंगे, ता. पनवेल, जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की. महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौने दुदरे(दुंदराई, ता. पनवेल, जि. रायगड येथिल फेरफार क्र.६३५ दि ०९/०१/१९६४ थे विरुध्द अर्जदार यांनी या न्यायालय त प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयान सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी हो दिनांक २३/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, नि. रायगड येथे समक्ष पेऊन आवश्यक त्या सबळ कागदपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे– दुंदरे (दुदराई), ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १२ | २ | ०.२४.०० | २.०० |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

**ठिकाण : पनवेल,**
**दिनांक :– १७/०७/२०२६**

**सही/–**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**



**अर्जदारातर्फे वकील अॅड. उज्वला तेटगुर**

### मे. दिवाणी न्यायाधिश क स्तर पनवेल यांचे कोर्टात

चौकशी अर्ज क. ९७९/२०२६
नि–७/ड
ने.ता.२९/८/२०२६

१, श्रीमती सुनंदा मारूती गोपनर
वयः ६० वर्षे, व्यवसाय गृहीणी,
राहणार : ए – १९ ओम साई घरकुल सीएचएस
उसरली केएच पोस्ट ओ ई जी सी तालुका पनवेल
ओ.ई. जी सी जवळ पनवेल आधार नं ४४७८३५७७९८०२

२. श्री राहुल मारूती गोपनर वयः ३५ वर्षे, व्यवसाय नोकरी
राहणार : प्लॅट नं २०३ सिध्दीविनायक
रेसीडन्सी प्लॉट नं २०८ सेक्टर २१ कामोठे
पनवेल जि रायगड आधार नं ९८७८०४८९१४३५

३. सौ आरती राहुल बंडगर लग्नापुर्वीचे नाव आरती मारूती गोपनर
क्यः ३३ वर्षे, व्यवसाय – नोकरी
राहणार : एस एस ३ रूम नं ३०३ सेक्टर १८ कोपरखैराने
नवी मुबंई ठाणे आधार नं – ९९४२४३६५५७५९

४ श्री अतुल मारूती गोपनर
क्यः ३० वर्षे, व्यवसाय नोकरी
राहणार :: ए–१९ ओम साई घरकुल सीएचएस
उसरली केएच पोस्ट ओ ई जी सी तालुका पनवेल ओ.ई. जी सी
जवळ पनवेल आधार नं ९७७९२७३२५७७२

विरूध्द **अर्जदार**

कोणी नाही

**जाहिर नोटीस**

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी कै. मारूती राजाराम गोपनर यांचे दिनांक ०९/१२/२०२४ रोजी फॅल्ट २०३ सिध्दीविनायक रेसीडेंन्सी प्लॉट नं २०८ सेक्टर २१ कामोठे पनवेल (मनपा) पनवेल रायगड येथे त्यांचे निधन झाले आहे. कै. मारूती राजाराम गोपनर यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

गट नं ५४ ६क्षेत्र ४६.१० या मिळकती वर बांधण्यात आलेली रू नं १९ क्षेत्र ३०० चौ. फु, व मोकळी जागा ४५० चौ. फुट मौजे उसर्ली खुर्द. ता पनवेल. जि. रायगड (ग्रामपंचायत उसर्ली खुर्द यांच्या असेसमेंट नुसार मालमता क. ३२९ क्षेत्रफळ ७२० चौ. फुट)

मयत कै. मारूती राजाराम गोपनर यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. मारूती राजाराम गोपनर यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक १७.०७ २०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शियानिशी दिली.

**सही/–**
**लिपीक**
**दिवाणी न्यायालय (व स्तर)**
**पनवेल, जिल्हा रायगड**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (कस्तर)**
**पनवेल, जिल्हा रायगड**



महावितरण

### ई–निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-७१ (२०२४-२५) (२nd call ), टी-७४ (२०२४-२५) (२nd call), टी-१३८ (२०२४-२५) (२nd call ), टी-१४४ (२०२४-२५) (२nd call), टी-१७० (२०२४-२५) (२nd call) आणि टी-१९५ (२०२४-२५) (२nd call ) अशा एकुण **सहा** निवीदा महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी दि. **१८.०७.२०२६ पासून ते दि. २४.०७.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख दि. **२४.०७.२०२६ ला १५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**

# वर्धापन दिन उत्साहात

























## 'रयत' रायगड विभागाकडून शिष्यवृत्ती परीक्षांसाठी विशेष तयारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था सातारा, रायगड विभाग कामोठे यांनी गुणवत्ता विकास कक्ष स्थापन करून त्या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शिक्षकांच्या व्यवसायिक विकासासाठी विविध उपक्रम राबवित आहेत. या नवीन शैक्षणिक वर्षात शासनाने शिष्यवृत्ती परीक्षा चौथी व सातवीसाठी घेणार असल्याने रायगड विभागाचे विभागीय चेअरमन बाळाराम पाटील, रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली



१५ जुलैला रायगड विभागाचे विभागीय अधिकारी कोंगेरे एम. के. व सहाय्यक अधिकारी जगताप व्हि. यू. यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाकडून इयत्ता सातवी स्कॉलरशिप परीक्षा व इयत्ता आठवी NMMS शिष्यवृत्ती परीक्षा तसेच इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता कक्षअंतर्गत ऑनलाइन लिंक पद्धतीने सराव चाचणी उपक्रम घेण्याचे ठरविले.

या सर्वांचे नियोजन करण्यासाठी विभागातून काही तज्ज्ञ शिक्षकांची निवड करण्यात आली. विभागीय अधिकाऱ्यांसमवेत सभा घेण्यात आली. यामध्ये आठवी एनएमएमएस परीक्षा प्रमुख वावंजे विद्यालयाचे मुख्याध्यापक पाटील एम.आर. , सातवी स्कॉलरशिप परीक्षा प्रमुख मार्केट यार्ड शाळेचे मुख्याध्यापक पाटील डी.सी., प्रा. किशोर सुरेश पाटील कला विभाग, प्रा. रमेश नारायण कोळी, वाणिज्य विभाग, प्रा. सरजिने दीपक, विज्ञान विभाग यांच्यासोबत तज्ज्ञ शिक्षकांची टीम तयार करून वर्षभराचे स्पर्धा परीक्षा ऑनलाइन लिंकचे नियोजन करण्यात आले.

ऑनलाइन सराव चाचणीसाठी प्रश्निक म्हणून विविध शाळांतील तज्ज्ञ शिक्षकांची विषयनिहाय निवड करण्यात आली. या उपक्रमात राज्यस्तरीय गणित विषयाचे तज्ज्ञ शिक्षक अनिल पाटील, तुषार म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले. सदर उपक्रम जुलै महिनाअखेर सुरू होईल, असे विभागीय अधिकारी कोंगेरे एम.के. यांनी सांगितले. विभागाच्या गुणवत्ता विकास कक्षाच्या नियोजन सभेसाठी उपस्थित मुख्याध्यापक व तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षक यांनी सहभाग घेतल्याबद्दल विभागीय कार्यालयाचे लेखनिक वैभव गावंड यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## खानावळे ग्रामपंचायतीतर्फे नागरिकांना कचराकुंडी, छत्री, कापडी पिशवी मोफत भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संपूर्ण घरपट्टी भरणाऱ्या नागरिकांना खानावळे ग्रामपंचायतीकडून घरगुती कचराकुंडी, छत्री आणि कापडी पिशवी मोफत देण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना सदाशिव वास्कर यांच्या उपस्थितीत सरपंच जयश्री सुभाष नाईक यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला.



या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य स्मिता अनंत पाटील, सामाजिक कार्यकर्ते अनंत पाटील, कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सदाशिव वास्कर उपस्थित होते. खानावळे ग्रामपंचायत राबवित असलेल्या या नाविन्यपूर्ण व स्तुत्य उपक्रमाचे सभापती व अन्य मान्यवरांनी कौतुक केले. याबाबत सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी धनंजय निकम यांना शुभेच्छाही देण्यात आल्या.

# रायगडात जलजन्य साथींचा विळखा

## अवघ्या १० दिवसांत तापाचे ३,५४२ रुग्ण; डेंग्यू–मलेरियाही वाढला, आरोग्य विभागाची घराघरात मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुसळधार पावसाचा जोर कमी झाला असला, तरी त्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीने रायगड जिल्ह्यासमोर नवे आरोग्यसंकट उभे केले आहे. साचलेले पाणी, बदलते हवामान आणि वाढलेली डासांची पैदास यामुळे जिल्ह्यात डेंग्यू, मलेरिया, लेप्टोस्पायरोसिससह विविध साथीच्या आजारांचे रुग्ण वाढू लागले आहेत. त्यामुळे जिल्हा आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून घराघरांत आरोग्य तपासणी, औषधोपचार आणि जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या अहवालानुसार, ५ ते १५ जुलै या कालावधीत जिल्ह्यात तापाचे ३,५४२ रुग्ण आढळले आहेत. याशिवाय सर्दीचे २,४४६, तीव्र अतिसाराचे १,०५६, इन्फ्लूएंझासदृश आजाराचे ६२३, मलेरियाचे ३१६, टायफॉईडचे १६५, डेंग्यूचे १२६ आणि लेप्टोस्पायरोसिसचे २ रुग्ण नोंदविण्यात आले आहेत. तसेच ६५ सर्पदंश आणि १,०६६ श्वानदंश प्रकरणांचीही नोंद झाली आहे.

यंदाच्या पावसाळ्यात अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली होती. पाणी ओसरल्यानंतर अनेक ठिकाणी अजूनही पाणी साचलेले असल्याने डासांची उत्पत्ती वाढली आहे. त्यातच कधी पाऊस तर कधी कडक ऊन अशा बदलत्या हवामानामुळे विषाणूजन्य आणि संसर्गजन्य आजारांना पोषक वातावरण तयार झाले आहे. परिणामी ग्रामीण आणि शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांची गर्दी वाढत आहे.

आरोग्य विभागाने आशा सेविका, आरोग्य कर्मचारी आणि वैद्यकीय पथकांच्या माध्यमातून सर्वेक्षण मोहीम हाती घेतली आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि मधुमेह, हृदयविकार यांसारख्या दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त व्यक्तींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी यांनी जिल्ह्यात आवश्यक औषधसाठा उपलब्ध असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरांद्वारे नागरिकांना तपासणी व उपचाराची सुविधा दिली जात असून ताप, अंगदुखी, सर्दी, उलट्या–जुलाब किंवा इतर लक्षणे दिसताच त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

***५ ते १५ जुलै : साथरोगांची स्थिती–***

***ताप ३,५४२, सर्दी २,४४६, श्वानदंश १,०६६, तीव्र अतिसार १,०५६, इन्फ्लूएंझासदृश आजार ६२३, मलेरिया ३१६, टायफॉईड १६५, डेंग्यू १२६, सर्पदंश ६५, लेप्टोस्पायरोसिस २.***

# पोलीस जवानाचा अपघातात मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत–मुरबाड महामार्गावरील कळंब–चाहूचीवाडी परिसरात रात्रीच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात श्रीवर्धन पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस जवान ऋतिक किसन ढोले (वय २६) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अपघातावेळी ऋतिक हे स्वतः इको कार चालवत होते. या अपघातात अन्य चार जण जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ऋतिक ढोले आपल्या चार मित्रांसह इको कारमधून कळंब येथून चाहूचीवाडी येथील आपल्या घरी निघाले होते. रात्रीच्या सुमारास गावाजवळील धोकादायक वळणावर कार वरील त्यांचा ताबा सुटल्याने वाहन भरधाव वेगात रस्त्याच्या कडेला असलेल्या लोखंडी संरक्षक रेलिंगवर जाऊन जोरात आदळले.

कारची धडक इतकी भीषण होती की लोखंडी संरक्षक रेलिंगवर कारचा एक भाग हवेत उचलला गेला आणि वाहनाचे मोठे नुकसान झाले.

अपघाताची माहिती मिळताच नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कळंब पोलीस चौकीचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

ग्रामस्थांच्या मदतीने सर्व जखमींना बाहेर काढून भिवपुरी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र गंभीर जखमी झालेल्या ऋतिक ढोले यांना रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले. अन्य चार जखमींपैकी दोघांना किरकोळ दुखापत झाली असून दोघांची प्रकृती गंभीर आहे. त्यापैकी एका जखमीला पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालय पनवेल येथे हलविण्यात आले आहे.

ऋतिक ढोले दोन वर्षांपूर्वी वडिलांच्या निधनानंतर अनुकंपा तत्त्वावर महाराष्ट्र पोलीस दलात दाखल झाले होते. ते सध्या श्रीवर्धन पोलीस ठाण्यात कार्यरत होते. नुकताच त्यांचा विवाह झाला होता आणि त्यांची पत्नी गरोदर असल्याने या दुर्दैवी घटनेने ढोले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# मुरुडमध्ये स्मार्ट मीटरबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती

**मुरुड : प्रतिनिधी**



महावितरणच्या वतीने स्मार्ट मीटरबाबत जनजागृती करण्यासाठी तेलवडे गावात विशेष प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी ग्रामस्थांना स्मार्ट मीटरचे कार्य, त्याचे फायदे आणि त्याबाबत निर्माण झालेल्या गैरसमजांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमात उपकार्यकारी अभियंता प्रेमराज पाटील ,अभियंते सतीश खरात, मनोज देशमुख,दिनेश ढाले, सचिन पवार, अजयसिंग यादव, विनायक ताजवे उपस्थित होते. उपकार्यकारी अभियंता प्रेमराज पाटील यांनी सांगितले की, स्मार्ट मीटर हे आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित असून ते ठराविक अंतराने वीज वापराची माहिती स्वयंचलितपणे महावितरणकडे पाठवते. त्यामुळे मीटर रीडिंग अधिक अचूक होते, बिलिंगमध्ये पारदर्शकता येते आणि ग्राहकांना मोबाईल ॲपद्वारे स्वतःच्या वीज वापरावर सतत लक्ष ठेवता येते.

तसेच स्मार्ट मीटरमुळे वीजचोरी आणि तांत्रिक नुकसान कमी होण्यास मदत होऊन भविष्यातील स्मार्ट ग्रीड व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार असल्याचे सांगण्यात आले.ग्रामस्थांनी स्मार्ट मीटरमुळे वीजबिल वाढते का, भविष्यात प्रीपेड प्रणाली लागू होणार का, असे विविध प्रश्न उपस्थित केले.

# श्रीवर्धनमध्ये जलवाहिन्या फुटण्याचे सत्र सुरूच, वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे होतोय पाण्याचा अपव्यय

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणारा रानवली पाझर तलाव श्रीवर्धनपासून पाच किलोमीटर अंतरावर आहे. या पाच किलोमीटर मार्गावर जलवाहिन्या बदलण्याचे काम दोन वर्षांपूर्वी करण्यात आले. तसेच जलशुद्धीकरण प्रकल्पाची निर्मितीदेखील करण्यात आली. परंतु सदर ठेकेदाराने वापरलेल्या जलवाहिन्या या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या असल्यामुळे वारंवार फुटत असल्याचे समोर येत आहे. जलशुद्धीकरण प्रकल्प ते साठवण टाकी या अंतरातील जलवाहिन्या वारंवार फुटत असल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जात आहे.

सदर जलवाहिन्या बदललेल्या असून सुद्धा वारंवार का फुटतात? यासाठी शिवसेनेने वेळोवेळी आंदोलन देखील केले होते. मात्र या संपूर्ण कामाचे स्ट्रक्चरल ऑडिट होणे अत्यंत गरजेचे आहे.

अनेक वेळा जसवली फाटा ते आराठी या ठिकाणी जलवाहिन्या फुटलेल्या आढळून येतात. जलवाहिन्यांमधून वाहणारे पाणी शेतामध्ये जाऊन तुंबलेले पाहायला मिळते. आता श्रीवर्धन शहरात अंतर्गत जलवाहिन्या फुटण्याचे प्रकार देखील सुरू झाले आहेत. मे महिन्यात श्रीवर्धन नगरपरिषेकडून धुप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती ई टॉयलेटची निर्मिती करण्यात आली आहे. या ई टॉयलेटला पाणीपुरवठ्यासाठी टाकलेली जलवाहिनी मागील अनेक दिवसांपासून फुटलेली असून नगर परिषदेने या ठिकाणचा पाणीपुरवठा सुरू केल्यानंतर सदर जलवाहिनीतून पाणी जाऊन त्या ठिकाणी पाणी तुंबलेले पाहायला मिळते. ई टॉयलेटची निर्मिती झालेली असून अद्याप त्यांचा वापर सुरू करण्यात आलेला नाही.

यावर्षी जलवाहिन्या फुटून लाखो लिटर पाणी वाया गेल्यामुळे मे महिन्यात श्रीवर्धन शहरातील नागरिकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागले होते. आता तरी नगरपरिषदेने धरणात असलेला पाणीसाठा जपून वापरावा व जलवाहिन्या फुटलेल्या आढळल्यास तातडीने दुरुस्त करावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

# रायगड जिल्ह्यात आत्मा योजनेतून मत्स्यपालनाला मिळणार चालना

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत सन २०२६–२७ मध्ये शेतीला पूरक व्यवसाय म्हणून मत्स्यपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी रायगड जिल्ह्यात एकूण ८६२ मत्स्यपालन प्रात्यक्षिके राबविण्यात येणार आहेत.या उपक्रमांतर्गत अलिबाग तालुक्यातील ४२ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून, त्यांना मत्स्यबीज, मत्स्यखाद्य आणि आधुनिक मत्स्यपालनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या योजनेत प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्याला एक हजार रोहू, कटला आणि मृगळ या सुधारित जातींचे मत्स्यबीज तसेच ६० किलो मत्स्यखाद्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. याशिवाय मत्स्यबीज संगोपन, खाद्य व्यवस्थापन, पाण्याच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक उपाययोजना आणि आधुनिक मत्स्यपालन तंत्रज्ञानाबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शनही दिले जाणार आहे.

या योजनेसाठी आवश्यक मत्स्यबीज व मत्स्यखाद्याचा पुरवठा मल्हार फिश इंटरप्रायझेस, वीर फिश सीड हॅचरी, वीर (ता. पुरंदर, जि. पुणे) यांच्यामार्फत करण्यात येणार आहे.या उपक्रमामुळे शेततळ्यांचा वर्षभर उत्पादक वापर होऊन शेतकऱ्यांना अतिरिक्त व शाश्वत उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मत्स्यपालन केल्यास उत्पादनवाढीसह आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यास मदत होईल, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

तालुका कृषी अधिकारी तन्मय भगत यांनी निवड झालेल्या सर्व लाभार्थी शेतकऱ्यांनी शास्त्रोक्त प्रशिक्षण घेऊन तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार मत्स्यपालन करावे आणि या योजनेचा प्रभावी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

शेतीसोबत मत्स्यपालनाचा पूरक व्यवसाय विकसित करण्यासाठी ‘आत्मा’ योजनेचा हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या लाभदायक ठरणार असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत आणि अधिक उत्पन्नाचा नवा मार्ग खुला होणार आहे.

### *शेततळे उपलब्ध असलेल्यांना संधी*

*अलिबाग तालुक्यातील खाडीलगतच्या भागात शेततळे उपलब्ध असलेल्या आणि मत्स्यपालनासाठी अनुकूल परिस्थिती असलेल्या शेतकऱ्यांची या योजनेसाठी प्राधान्याने निवड करण्यात आली आहे.शेतीबरोबरच शेततळ्यांचा प्रभावी वापर करून मत्स्यपालनाचा पूरक व्यवसाय विकसित करणे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि एकात्मिक शेती पद्धतीला चालना देणे हा या प्रात्यक्षिकांचा प्रमुख उद्देश आहे.*

**“ खाडीलगतच्या भागातील शेततळ्यांचा प्रभावी वापर करून मत्स्यपालनाला चालना देणे, शेतीबरोबरच अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत निर्माण करणे आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढविणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.**

**–तन्मय भगत, तालुका कृषी अधिकारी, अलिबाग**

# रातवड माध्यमिक विद्यामंदिर येथे चार हजार सीड बॉल लागवड उपक्रम



**माणगाव : बातमीदार**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा व पर्यावरण पूरक सीड बॉल लागवड कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.सदर माध्यमिक विद्यामंदिर रातवडच्या विद्यार्थ्यांनी नुकतेच चार हजार सीडबॉलची लागवड लागवड करण्यात आली.

या पर्यावरण पूरक उपक्रमासाठी इंदापूर वन विभागाचे वनपाल राजमाने, वनरक्षक वैशाली भोर, अशोक पोहकडे, आमीना मनेर निलेश नाईकवडे तसेच रातवड हायस्कूलचे पालक, शिक्षक संघाचे सदस्य प्रणिता साटम, जानवी शिंदे, अमोल जाधव, राम येलकर इत्यादी उपस्थित होते.

सुरुवातीला विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या हस्ते मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर शाळेच्या परिसरामध्ये करंज, आवळा, आंबा, जांभूळ या वनस्पतींचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वनविभागाचे वनपाल राजमाने यांनी सीड बॉल म्हणजे काय? पर्यावरणाला सीड बॉलचे फायदे तसेच जैवविविधता आणि पर्यावरण संवर्धन सीडबॉल च्या माध्यमातून कसे राखले जाते याची माहिती देऊन घरच्या घरी सीड बॉल कसे बनवावे याबाबत उपयुक्त माहिती दिली.

विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांनी अध्यक्षीय मनोगतात असे म्हटले की, आपण निसर्गाचा भाग आहोत ही भावना मनात ठेवून पर्यावरणाचा समतोल राखणे गरजेचे आहे तसेच पर्यावरण वाचविण्यासाठी आपण काय काय करू शकतो समाज म्हणून पर्यावरणाबाबत आपली भूमिका काय याबाबत अनमोल माहिती दिली त्यानंतर शाळेच्या परिसरामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांना मार्फत सुमारे चार हजार सीडबॉल लावण्यात आले. यावेळी पर्यावरण प्रमुख भिवा पवार सर तसेच विद्यालयातील शिक्षक डॉ. शारदा निवाते,राजेंद्र भगत, श्रीकृष्ण गरधे, बाळासाहेब गायकवाड आदि उपस्थित होते.

## लायन्स क्लबकडून विद्यार्थ्यांना वह्या, खाऊचे वाटप

**नागोठणे : बातमीदार**

येथील लायन्स क्लबच्या माध्यमातून एमजेएफ विजय गणात्रा यांच्या सौजन्याने सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या वांगणी हायस्कूलमधील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आयोजित या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन विलास चौलकर म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला वाघिणीच्या दुधाची उपमा दिली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन भरपूर अभ्यास करावा.

# पेण पालिकेची स्वच्छता मोहीम

**पेण : प्रतिनिधी**

मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पेण शहरात बऱ्याच ठिकाणी पावसाचे पाणी साचून पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती, मात्र आता पावसाने काही प्रमाणात विश्रांती घेतल्याने शहरातील सफाईची कामे युद्धपातळीवर करण्याचे आदेश पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सफाई विभागाला दिले आहेत.

नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे पेण शहरातील बऱ्याच ठिकाणी पावसाचे पाणी साचले होते, तर बरेच नाले तुडुंब भरून त्यातून आलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या आणि इतर कचरा हा रस्त्यावर आला होता. या सर्व प्रकाराने शहरामध्ये कोणत्याही प्रकारची रोगराई पसरू नये याचा विचार करून पेण शहरात प्रत्येक प्रभागात साफसफाईच्या कामाला प्राधान्य देत सफाई अधिकारी दयानंद गावंड यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना संबंधित कामे चोखपणे पार पाडण्याचे आदेश दिले.

शहरात सफाईचे काम करत असताना छोटे मोठे नाले सफाई, उन्मळून पडलेल्या झाडांच्या फांद्या, नाल्यांमधील काढलेला मलमा उचलणे, शाळा परिसर, सार्वजनिक शौचालय, विविध बगीचे, तलावा भोवतीचे जॉगिंग ट्रॅक, स्मशानभूमी आदी ठिकाणची साफसफाई सफाई कामगारांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. सदर सफाई करण्यात आल्यानंतर ठिकठिकाणी पावडर आणि औषध फवारणी करण्यात येणार असून तलावांचे जॉगिंग ट्रॅक किंवा इतर निसटत्या ठिकाणी देखील पावडरचा मारा करण्यात येणार असल्याचे पालिकेचे सफाई अधिकारी दयानंद गावंड यांनी सांगितले.



## तळा येथील गो. म. वेदक विद्यामंदिरात रक्तदान शिबीर

**तळा : प्रतिनिधी**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य आणि स्वर्गीय बाळशेठ देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त गो. म. वेदक विद्यामंदिर, तळा येथे नुकतेच एका भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराला रक्तदात्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा येथील राष्ट्रीय सेवा योजना, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गो म वेदक विद्यामंदिर, डॉ प्र म जोशी प्रशाला पन्हेळी, प्राथमिक विद्यामंदिर या सर्व विभागाच्या वतीने हे रक्तदान शिबीर यशस्वी पार पडले.

सदर शिबीर यशस्वी पार पडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता कुंटेवाड, प्रा. भरत चाळके, महादेव लोकरे, मितेश मुळे, प्रा पाटील एन सी, सुहास वावेकर आणि एनएसएसच्या स्वयंसेवकांनी प्रयत्न केले.

याप्रसंगी तळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे, संस्थेचे अध्यक्ष मंगेश देशमुख, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सचिव महेंद्र कजबजे, खजिनदार चंद्रकांत रोडे, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन बी के पटेल, प्राचार्य डॉ नानासाहेब यादव, हे उपस्थित होते.

रक्त संकलनाचे महत्वाचे काम सिव्हिल हॉस्पिटल, ब्लड सेंटर अलिबाग–रायगडच्या तज्ज्ञ वैद्यकीय पथकाने चोखपणे पार पाडले.

# सिंधू 'जपान ओपन'च्या फायनलमध्ये



टोकियो : वृत्तसंस्था

जपान ओपनच्या महिला एकेरीच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित करत भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने इतिहास रचला आहे. तिने शनिवारी (दि. १८) झालेल्या उपांत्य सामन्यात विद्यमान ऑलिम्पिक विजेती आणि चीनची कट्टर प्रतिस्पर्धी चेन युफेईचा पराभव केला. या कामगिरीमुळे या प्रतिष्ठित स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहचणारी सिंधू पहिलीच भारतीय महिला बॅडमिंटनपटू ठरली आहे.

सिंधूसाठी हा विजय एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. या विजयामुळे चेन युफेईविरुद्धचा सलग पाच सामन्यांचा पराभवाचा सिलसिला संपुष्टात आला असून २०१९च्या बीडब्ल्यूएफ विश्व अजिंक्यपद स्पर्धेनंतर चीनच्या या खेळाडूवर मिळवलेला हा तिचा पहिलाच विजय आहे. विद्यमान ऑलिम्पिक विजेती चेन युफेई हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे दुसऱ्या गेमदरम्यान सामन्यातून बाहेर पडल्याने दोनदा ऑलिम्पिक पदक जिंकणाऱ्या सिंधूने पुढील फेरी गाठली. सिंधूने पहिला गेम २१-१९ असा जिंकला होता आणि दुसऱ्या गेममध्ये ती १५-१० अशी आघाडीवर असतानाच या चिनी स्टार खेळाडूला माघार घ्यावी लागली.

टोकियोमध्ये सुरू असणाऱ्या जपान ओपन स्पर्धेत सिंधूचा प्रवास अत्यंत प्रभावी राहिला. तिने आपल्या मोहिमेची सुरुवात अत्यंत आत्मविश्वासाने केली. यात जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या हान यूविरुद्धचा दिमाखदार विजय आणि माजी विश्वविजेती नोजोमी ओकुहारा हिने उपांत्यपूर्व फेरीत दिलेला वॉकओव्हर यांचा समावेश आहे.


आता रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात सिंधूचा सामना जपानची स्थानिक खेळाडू आणि माजी विश्वविजेती अकाने यामागुची हिच्याशी होणार आहे. आपले पहिले जपान ओपन विजेतेपद पटकावून बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरवर आपले वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्याचे सिंधूचे लक्ष्य असणार आहे.

> **मी अंतिम फेरीत पोहचले आहे याचा मला खूप आनंद आहे. माझ्यासाठी पहिल्या सामन्यापासून प्रत्येक सामना महत्त्वाचा होता, विशेषतः आजचा सामना. सुरुवातीपासून एकाग्र राहणे गरजेचे होते, कारण जेव्हा तुम्ही अव्वल मानांकित खेळाडूंसोबत खेळता, तेव्हा प्रत्येक गुण महत्त्वाचा असतो.**
> **-पी.व्ही. सिंधू**

## सर गॅरी सोबर्स यांच्या निधनाने विराट भावूक

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

वेस्ट इंडिजचे महान अष्टपैलू क्रिकेटपटू सर गॅरी सोबर्स यांचे निधन झाले असून क्रिकेटमधील एका अत्यंत गौरवशाली कारकिर्दीचा अंत झाला आहे.



विराट कोहलीने त्यांना श्रद्धांजली वाहिली. 'क्रिकेटने आपला एक महान खेळाडू गमावला', अशा भावना त्याने व्यक्त केल्या.

विराटने 'एक्स'वर गॅरी सोबर्स यांच्याबद्दल शोकसंवेदना व्यक्त केली आणि त्यांना खेळाचे कौतुक केले. "क्रिकेटने आपला एक महान खेळाडू गमावला आहे. सर गॅरी सोबर्स, तुम्हाला भावपूर्ण श्रद्धांजली. तुमचा वारसा अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील," असे त्याने लिहिले आहे.

## 'हिटमॅन'च्या निवृत्तीच्या बातम्यांना पूर्णविराम!

### लॉर्ड्स वनडेबाबत बीसीसीआयचा मोठा खुलासा

नवी दिल्ली : वृत्तसंस्था



इंग्लंडविरुद्ध लॉर्ड्स येथे होणारा तिसरा वनडे सामना रोहित शर्माचा आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील अखेरचा सामना ठरणार का? अशी चर्चा भारतीय क्रिकेट चाहत्यांमध्ये रंगली आहे. काही माध्यमांमध्ये याबाबतच्या बातम्या आल्या, मात्र भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने या सर्व चर्चांना पूर्णविराम देत अधिकृत भूमिका स्पष्ट केली आहे.

एका वृत्तानुसार राष्ट्रीय निवड समितीने रोहित शर्मा हा २०२७च्या वनडे विश्वचषकाच्या नियोजनाचा भाग नसल्याचे स्पष्ट केल्याचा दावा करण्यात आला होता. त्यामुळे लॉर्ड्सनंतर रोहित निवृत्ती जाहीर करू शकतो, अशा चर्चांना जोर आला. या पार्श्वभूमीवर बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी या सर्व अफवा फेटाळून लावल्या. त्यांनी सांगितले की, रोहित शर्माच्या भवितव्याबाबत माध्यमांमध्ये विविध चर्चा सुरू आहेत, मात्र लॉर्ड्समधील सामना त्याचा अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना असेल, अशी कोणतीही चर्चा बीसीसीआयमध्ये झालेली नाही. ते पुढे म्हणाले, रोहित भारतीय वनडे संघाचा नियमित सदस्य आहे. जोपर्यंत तो संघाच्या योजनांचा भाग असेल, तोपर्यंत तो भारताचे प्रतिनिधित्व करत राहील. त्यामुळे लॉर्ड्समधील सामना त्याचा अखेरचा सामना नाही.

## स्पेन जिंकणार की अर्जेंटिना?

### फायनलपूर्वी बायचुंग भुतिया यांनी केले भाकित



कोलकाता : वृत्तसंस्था

फिफा विश्वचषक स्पर्धा आता आपल्या अंतिम टप्प्यावर पोहोचला असून रविवारी होणाऱ्या महामुकाबल्यात स्पेन आणि अर्जेंटिना आमनेसामने असतील. या रोमांचक सामन्यापूर्वी भारतीय फुटबॉलचे माजी कर्णधार बायचुंग भुतिया यांनी आपली मते मांडली असून, त्यांनी 'ला रोजा' म्हणजेच स्पेनच्या संघाला विजयासाठी पसंती दिली आहे.


या चर्चेशी संबंधित एका महत्त्वाच्या मुद्द्यावर बोलताना भुतिया म्हणाले की, दिएगो मॅराडोना हे आजही लिओनेल मेस्सीपेक्षा सरस आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, १९८६चा विश्वचषक मॅराडोनाने जवळपास एकहाती जिंकला होता. फुटबॉल इतिहासात अशी कामगिरी अन्य कोणीही केलेली नाही. मेस्सी एक महान खेळाडू नक्कीच आहे, पण त्याला सध्या एका भक्कम टीमची साथ मिळत आहे. जर मेस्सीने हा विश्वचषक जिंकला, तर तो नक्कीच मॅराडोनाच्या उंचीच्या बरोबरीला पोहचेल.

सामन्याच्या निकालाबाबत भाष्य करताना, भुतिया यांनी स्पेनचा संघ हा सध्याच्या स्पर्धेतील सर्वात परिपूर्ण संघ असल्याचे सांगितले. त्यांच्या मते, स्पेनची मिडफिल्ड अत्यंत प्रभावी आहे, ज्यामुळे ते संघ म्हणून खेळतात आणि कोणत्याही एका खेळाडूवर अवलंबून नाहीत, मात्र अर्जेंटिनाला पूर्णपणे दुर्लक्षून चालणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

अर्जेंटिनाने या स्पर्धेत अनेकदा पिछाडीवरून शानदार पुनरागमन केले आहे. त्यांची खेळी अनपेक्षित असल्याने त्यांना कमी लेखणे स्पेनसाठी घातक ठरू शकते. तरीही स्पेनची संतुलित बांधणी पाहता, विश्वचषक जिंकण्याची त्यांची शक्यता अधिक असल्याचे भुतिया यांनी व्यक्त केले. आता न्यू जर्सीच्या मैदानात कोण बाजी मारणार याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

## क्रिकेटवेड्या देशात फिफा' फिव्हर!

### कोल्हापूर झाले फुटबॉलमय



कोल्हापूर : प्रतिनिधी

भारत हा तसा क्रिकेटवेडा देश, पण कोल्हापूरची गोष्टच न्यारी आहे! 'सॉकर सिटी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापुरात सध्या फिफा विश्वचषकाचा जबरदस्त फिव्हर पाहायला मिळत आहे. नुकत्याच अटलांटा येथे झालेल्या विश्वचषक उपांत्य फेरीत अर्जेंटिनाने इंग्लंडवर २-१ असा विजय मिळवून सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत धडक मारली आणि या विजयाचा जल्लोष कोल्हापूरच्या रस्त्यांवर ओसंडून वाहताना दिसला.

अर्जेंटिनाचा स्टार खेळाडू लिओनेल मेस्सी आणि त्याच्या टीमसाठी कोल्हापूरचे चाहते रात्रभर जागे होते. ५५व्या मिनिटापर्यंत अर्जेंटिना पिछाडीवर असताना मेस्सीच्या दमदार खेळीने सामना फिरवला आणि चाहत्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. आता अंतिम सामन्यात अर्जेंटिना विरुद्ध स्पेन अशी हाय-व्होल्टेज लढत पाहण्यासाठी कोल्हापूर सज्ज झाले आहे.

कोल्हापूरच्या चौका-चौकात आवडत्या संघांचे झेंडे, पताका आणि जर्सी घालून फिरणारे चाहते यामुळे संपूर्ण शहर अर्जेंटिना आणि ब्राझीलच्या रंगांत न्हाऊन निघाले आहे. मेस्सी, ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि नेमार यांचे तब्बल ४० फुटी कटआऊट्स शहराच्या आकर्षणाचे केंद्र बनले आहेत. मिरजकर तिकटी येथे मेस्सीचा, तर बिंदू चौकात रोनाल्डोचा भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.

कुस्ती आणि अस्सल कोल्हापुरी तांबडा-पांढरा रस्सा यासाठी प्रसिद्ध असलेल्या या शहराने आता फुटबॉलच्या मैदानातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. कोल्हापूरकरांच्या या उत्स्फूर्त प्रेमाची दखल थेट 'फिफा'नेही घेतली असून त्यांनी सोशल मीडियावर चक्क मराठीतून पोस्ट करत कोल्हापूरच्या 'लय भारी' चाहत्यांचे कौतुक केले आहे.

कोल्हापूरचे फुटबॉलशी नाते नवे नाही. १९१०पासून सुरू झालेली ही परंपरा आजही तितक्याच उत्साहाने जपली जात आहे. १९४०मध्ये छत्रपती राजाराम महाराजांच्या पुढाकाराने कोल्हापूर स्पोर्ट्स असोसिएशनची स्थापना झाली, तर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पोलंडच्या शरणार्थींनी येथे युरोपियन फुटबॉल संस्कृती रूजवली. आज १००पेक्षा जास्त नोंदणीकृत क्लब आणि हजारो खेळाडूंमुळे कोल्हापूर खऱ्या अर्थाने भारताची 'दुसरी फुटबॉल पंढरी' बनले आहे.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com